मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

साहित्यसंचारकर्ते डॉ. कोलते — डॉ. मा. गो. देशमुख

असेल निशा काळी. . . काळी. . . — प्रा. कृष्णा चौधरी

पं. खाँसाहेब बडे गुलामअली — वामन इंगळे

कै. वामन मल्हार जोशी — प्रा. अनन्त अडावदकर

याशिवाय ललित लेख, कविता, पुस्तक परीक्षणे

संपादक : प्र. बा. उध्वरेषे

प्रकाशक : मा. नी. गलगलीकर,
सरचिटणीस वि. सा. संघ

वर्ष २३ / अंक : दुसरा–तिसरा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ-पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २३) जून–जुलै १९६८ (अंक २–३

संपादक
प्र. वा. उर्ध्वरेषे

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
व्हीनस प्रिंटींग हौस
धंतोली, नागपूर–१

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

– अंतरंग –

साहित्यसंचारकर्ते डॉ. कोलते	डॉ. मा. गो. देशमुख	४२
कै. वामन मल्हार जोशी	प्रा. अनन्त अडावदकर	४८
असेल निशा काळी काळी	प्रा. कृष्णा चौघरी	५०
मराठीचे अध्यापनात लोकसाहित्याचे महत्व	वि. वा. जोशी	५२
पं. खांसाहेब वडे गुलामअली	वामन इंगळे	५४
पुस्तक परीक्षणे		५६
दोन ललित लेख–		
कवच	म. ल. वराडपांडे	५९
वरात	ताराचंद्र खांडेकर	६०
गरु, शिष्य आणि मित्र	म. ल. वराडपांडे	६२
कविता –		
डोळे	कुसुमानंद	६३
उमलण्यापूर्वी	,,	६३
उद्या	वामन इंगळे	६३
नाहीतर	रमेश ललगुणकर	६४
अभेद	,,	६४
मराठी रंगभूमी प्रदर्शन	सुधाकर लोखंडे	६५
वि. सा. संघाचे नवे अध्यक्ष श्री. माडखोलकर यांचे निवेदन		६८
संपादकीय		६९
संघवार्ता		१

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'साहित्यसंचार'कर्ते डॉ. कोलते

डॉ. मा. गो. देशमुख

[विदर्भ साहित्य संघाचे पूर्वाध्यक्ष डॉ. वि. भि. कोलते यांच्या वयाला साठ वर्षे नुकतीच पूर्ण झाली. त्यानिमित्त त्यांच्या' साहित्यसंचार ' या समीक्षणात्मक लेखसंग्रहाचे रसग्रहण करणारा डॉ. माधव गोपाळ देशमुख यांचा हा लेख ' वाङ्मयीन व्यक्ती ' या संग्रहातून त्यांच्या परवानगीने येथे पुनर्मुद्रित केला आहे. – संपादक]

डॉ. विष्णु भिकाजी कोलते हे एका अग्रगण्य महाविद्यालयाचे प्राचार्य आणि आता कुलगुरु म्हणून सुविख्यात आहेत. ही ख्याती त्यांना गेली तीस–पस्तीस वर्षे शिक्षणक्षेत्रात जो अनुभव आला व त्यांनी जी कार्यक्षमता कमावली तिला सुसंगत आणि क्रमप्राप्त आहे. एम्. ए., एल्एल्. बी. पर्यंत त्यांनी ज्या निरलस व निरागस पद्धतीने अध्ययन केले त्याचाच परिपाक म्हणून ते एक आदर्श प्राध्यापक झाले यातही काही नवल नाही. महानुभवीय वाङ्मयाचे, तत्वज्ञानाचे व आचारधर्माचे गाढ संशोधक व सर्वोच्च पदवीवर म्हणून त्यांनी जी अधिमान्यता मिळविली, तीही त्यांच्या चिकित्सक व चतुरस्त्र बुद्धीची आणि चोखंदळ व चौकस दृष्टीचीच द्योतक आहे.

पण काही झाले तरी अध्ययन – अध्यापन व संशोधन – प्रशासन ही सारी क्षेत्रे त्यांच्या व्यावसायिक जीवनाचाच भाग होत. व्यवसायाचे कोणतेही क्षेत्र घेतले तरी त्यात मशागत करणारा मनुष्य जितका कसून प्रयत्न करील तितका तो यशस्वी होईल. कारण व्यवसाय म्हटला की त्यात सर्जनापेक्षा श्रमाला आणि कलेपेक्षा कष्टाला महत्व अधिक असणार; अर्थात, आत्मनेपदी अंतर्मुखतेपेक्ष परस्मैपदी बहिर्मुखतेलाच येथे प्राधान्य मिळणार ! वित्तार्जन असो की विद्यार्जन असो, त्यात क्षणशः आणि क्रमशः श्रमसाधना ही करावीच लागते. ती डॉक्टरांनी केली व ते विद्याधनी व यशोधनीही झाले.

पण हे यश म्हणजे डॉ. कोलते यांच्या व्यक्तित्वाचा केवळ एक पैलू होय. श्रमसाधनेच्या याच काळात त्यांनी जी वाङ्मयाभिरुची विकसित केली आणि जी सर्जनशीलता संपादन केली त्यामुळे त्यांनी आपल्या व्यक्तित्वाला वाङ्मयीन पैलू जोडला. वाङ्मयीन व्यक्तित्वाचा विकास हा काही ' आपुलिया बळे ' वनू शकत नाही, किंवा काही तरी ' आगंतुक गुणांची सोय ' धरूनही साधता येत नाही. तो पुष्कळ अंशी पूर्वार्जित संस्कारांवर व 'सहज गुणां'वर अवलंबून असतो, तेथे 'मूळचाच झरा' असावा लागतो.

वाङ्मय–निर्मितीची मीमांसा

वास्तविक पाहता त्यांनी वऱ्हाडातील एका आडमार्गावरील खेड्यात एका शेतकरी पाटील घराण्यात जन्म घेतलेला. अशा परिस्थितीत बालपणी गावातले किंवा घरातले संस्कार तरी कोठून येणार ? गाठीशी पैसा नाही, पाठीशी परंपरा नाही; श्रेष्ठांचा संप्रदाय नाही, मोठ्यांचे मार्गदर्शन नाही; अर्थात तथाकथित उच्च वातावरणही नाही. शिक्षण हेही बहुतेक सारे स्वेच्छेने घेतलेले. अशा प्रतिकूल परिस्थितीत कष्ट, कष्ट आणि कष्ट, हाच मंत्र जपत ज्याने आजवरचा मार्ग आक्रमण केला व लौकिकदृष्टचा अत्युच्च पद मिळविले त्यानेच वाङ्मयाच्या क्षेत्रात आपल्या व्यक्तित्वाचा भावगंध कसा सर्वत्र दरवळून दिला याची मीमांसा करणे फारसे दुष्कर नाही.

प्राक्तनप्राप्त प्रतिभेचा अंश असलेल्या डॉ. कोलत्यांच्या श्रमसातत्याला कसोटी लागावी म्हणूनच की काय, अशा विपरीत परिस्थितीला त्यांना तोंड द्यावे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लागले. मुळात असलेल्या प्रतिभागुणाबरोबर अक्षर-वाङ्मयाच्या परिशीलनामुळे त्यांची अभिरुची सुशिक्षित झाली, विपरीत परिस्थितीच्या कसोटीवर घासल्यामुळे त्यांच्या जीवनानुभूतीची क्षितिजे विस्तृत झाली व समानधर्मीयांच्याविषयी त्यांच्या मनात असीम सहानुभूती निर्माण झाली. जगातील त्रिविध तापांनी पोळल्यामुळे आणि प्रेष्ठ व श्रेष्ठ वाङ्मयाच्या परिशीलनामुळे ज्याचा मनोमुकुर विशदीभूत झाला आहे अशा सहृदय व्यक्तीला वाङ्मयीन विश्वाशी तन्मय व्हावेसे वाटले आणि आपले सारे व्यक्तिमत्त्व साहित्याच्या रसात आणि सर्जनाच्या सौरभात विलीन करून टाकावेसे वाटले, तर त्यात नवल ते कसले ?

महाविद्यालयीन वातावरणात वावरताना समाजातील उच्चभ्रू लब्धप्रतिष्ठांच्या सहवासात ते रमू शकले नाहीत. पैसा आणि प्रतिष्ठा यांच्या पाठीमागे धावणारे दिग्गज काळाच्या महापुरात घडाघडा वाहून जाताना पाहून त्यांची प्रतिभा 'लव्हाळी' सारख्या काव्यनिर्मितीत रमू लागली, त्यांची संशोधनप्रवृत्ती जातिभेद आणि अस्पृश्यता समूळ नष्ट करू इच्छिणाऱ्या महानुभवीय पंथात अनिरुद्धपणे संचरू लागली व त्यांची अभिजात रसिकता लोकसमुदायासाठी निर्माण झालेल्या नाट्य-वाङ्मयात रंगू लागली. डॉ. कोलत्यांच्या साऱ्या आवडीनिवडींचे रहस्य म्हणजे त्यांना बालपणापासून जे जीवन पहावे, जगावे व अनुभवावे लागले त्याची प्रतिक्रियाच नव्हे काय?

परस्परविरुद्ध स्वभावगुणांचे मिश्रण

सामाजिक विषमतेच्या वारंवार सोसाव्या लागलेल्या झळांमुळे त्यांची काव्यकळी लव्हाळीसारखी हळुवार बनली. पददलित लोकांच्या अपरंपार सहानुभूतीमुळे व जिव्हाळ्यामुळे त्यांचा स्वभाव जसा हळवा, तसाच ती दुःखे वेशीवर टांगतांना व्यक्त कराव्या लागलेल्या कटुतेमुळे कडवट बनला. जिव्हाळा आणि कडवटपणा या परस्परविरुद्ध स्वभावगुणांचे डॉ. कोलते यांच्या ठिकाणी मोठे मनोहर मिश्रण दिसून येते, याचे मर्म त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तित्वात शोधावे लागते. डॉ. कोलत्यांचा स्वभाव काहीसा कडक व रागावणारा वाटतो खरा; पण त्यांचे मन लहान मुलासारखे निर्मळ असल्यामुळे त्यांच्या रागाला अनुरागाची रमणीयता आली आहे. जगन्नाथ पंडितांनी म्हटल्याप्रमाणे

> विश्वाभिरामगुणगौरवगुम्फितानां
> रोषोऽपि निर्मलधियां रमणीय एव ।
> लोकंपृणैः परिमलैः परिपूरितस्य
> काश्मीरजस्य कटुताऽपि नितान्तरम्या ॥

वाङ्मय हे एक असे रसायन आहे की त्यात रममाण झालेल्या व्यक्तीचे लौकिक रागद्वेष पार नाहीसे होतात. किंबहुना, वाङ्मयाच्या अलौकिक आणि अभिराम विश्वात ज्यांनी आपले व्यक्तित्व विलीन करून टाकले आहे अशी माणसे प्रसंगविशेषी रागावणारी वाटत असली, तरी त्यांच्या रागाच्या मुळाशी त्यांचा निष्कपट स्वभाव असतो, हे लक्षात घेतले पाहिजे. 'उष्णत्वमग्न्या-तपसंप्रयोगात् शैत्यं हि यत्सा प्रकृतिर्जलस्य' हेच खरे ! आणि त्यांची कटुता ?—आपल्या स्वभाविक सुगंधाने सारे विश्व भारून टाकणाऱ्या केशराची कटुता कुणाला कधी जाणवली आहे काय ?

जीवनाचा नाटकाशी ऋणानुबंध

निर्मळ जिव्हाळ्याचा हळवेपणा आणि सात्त्विक संतापाचा कडवटपणा या लौकिक जीवनातील दोन टोकांची तीव्रता कमी करणाऱ्या प्रतिभावंताजवळ जर कोणता विरंगुळा असेल तर तो ललित वाङ्मय हाच होय. त्यातल्या त्यात भिन्न गुणांच्या संघर्षामुळे ज्यांना त्रैगुण्योद्भव लोकप्रवृत्तींशी लढा द्यावा लागतो व ज्यांची अभिरुची नाना रसांना आवाहन करणारी असते त्यांची मनोवृत्ती नाट्यवाङ्मयाशी विशेष समरस होते ; त्यांच्या प्रकृतिसिद्ध गुणांचे समाराधान बहुधा नाट्यच करू शकते, काव्य किंवा कादंबरी नाही.

डॉ. कोलते यांच्या प्रतिभेने काव्य आणि कथा यांचे प्रान्त ओलांडून प्रामुख्याने नाट्यातच रमावे हा काही केवळ योगायोग नव्हे. आपल्या जीवननाट्याच्या पहिल्या चार अंकांत ते वाङ्मयाच्या विविध क्षेत्रात रंगून गेले असले तरी आजच्या पाचव्या अंकापर्यन्त त्यांचे नाट्य-प्रेम अबाधित राहिले आहे, याचे कारण त्यांच्या जीवनाचा नाट्याशी असलेला ऋणानुबंध होय. १९२० च्या असहकारितेच्या चळवळीत शाळा सोडल्यामुळे वडिलांनी घराबाहेर घालविल्यानंतर विनातिकिट प्रवास करताकरता बारा वर्षांच्या कोलत्यांच्या हातात खाडिलकर-केळकरांची नाटके असावी, यावरून लहानपणापासून त्यांच्या ठिकाणी असलेले नाट्यप्रेम दिसून येत नाही काय ? पुण्याला विनातिकिट जाण्याचा त्यांच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आयुष्यातील प्रसंग (पाहा : 'लोकसत्ता' २८-२-६५) जितका नाट्यमय तितकाच त्यावेळी ज्यांनी आपणाला आसरा देऊन मार्गाला लावले त्या सेवानिवृत्त वयोवृद्ध पोलिसाच्या चरणांवर ५५ वर्षांच्या भेटीनंतर कृतज्ञतापूर्वक डोके ठेवण्याचाही प्रसंग नाट्यमय !

डॉ. कोलत्यांनी मराठी रंगभूमीवरील नाट्यवैभवाचा उज्ज्वल काळ केवळ पाहिलेलाच आहे असे नाही, तर नाट्याचे अवलोकन व परिशीलन यांबरोबर अभिनय, दिग्दर्शन व लेखन अशा सर्व भूमिका त्यांनी वठविलेल्या असल्यामुळे त्यांच्याकडून नाट्यसमीक्षात्मक लेखनही विपुल प्रमाणात व्हावे यात काही आश्चर्य नाही.

कालिदासाच्या थोरवीचे नवे पैलू

प्रस्तुत 'साहित्यसंचारा' तील निवडक लेखांत अर्ध्याहून अधिक लेख नाट्यविषयक आले याची मीमांसा ही अशी आहे. डॉ. कोलते यांचा वाङ्मयीन पिंड हा मुख्यतः नाट्यवाङ्मयावर पोसला गेला असल्यामुळे त्यांच्या समीक्षासामर्थ्याचे सर्व विशेष त्यांच्या नाट्य-परीक्षणात्मक लेखांत अभिव्यक्त झालेले आहेत. 'कालिदासाच्या नाट्ययशाचे रहस्य' उलगडून दाखविण्याच्या निमित्ताने त्यांनी मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय व शाकुंतल ही नाटके कोणत्या कारणाने यशस्वी झाली, याची मिमांसा केली आहे. जवळजवळ स्त्रीपात्रविरहित असे 'मुद्राराक्षस' आणि केवळ कुलीन नायिकांनी युक्त असे 'वेणीसंहार' यांपेक्षा गणिकेला ज्यात नायिकापद दिले आहे असे 'मृच्छकटिक' रंगभूमीवर अधिक यशस्वी होते. कालिदासाच्या काळी स्त्रियांची कामे स्त्रियाच आणि विशेषत: गणिका करीत असलेल्यामुळे नटींच्या अंगी असलेल्या गायन, वादन, नर्तन व अभिनय यांच्या कौशल्याला विशेष वाव मिळेल अशी व विशेषकरून रंगभूमीवर प्रेक्षकांच्या शृंगारप्रियतेला आवाहन देणारी अशी दृश्ये कालिदासाने बुद्धया योजली आहेत. किंबहुना मालविका, उर्वशी आणि शकुंतला या नायिकांची निवड त्याने गणिकाप्राय नटींच्या शृंगाररसाच्या उत्तरोत्तर आविष्काराला वाव मिळावा याच हेतूने केली आहे. मालविका ही वेश्याकुलातील नाही; पण कालिदासाने तिला विगतनेपथ्य किंवा विरलनेपथ्य अशा अवस्थेत रंगभूमीवर पदार्पण करावयास लावले आहे. 'शाकुंतल' नाटकातही फुलझाडांना पाणी घालणारी, भुंग्याच्या त्रासामुळे तारांबळलेली व सर्वांच्या समोर रेशमी पातळ नेसायला लावलेली शकुंतला दिसते. 'विक्रमोर्वशीया' तील नायिका तर सर्वस्वी वेश्याच कल्पिली आहे आणि तिच्याबरोबर अनेक गौण पात्रांच्या जागीही वेश्यांचीच योजना केली आहे. अर्थात कालिदासाच्या नाट्ययशाचे मुख्य रहस्य म्हणजे गणिकानटींना अनुकूल अशा प्रसंगांची आणि पात्रांची निवड करणे हेच होय.

कालिदासाच्या प्रतिभेची थोरवी आजवर अनेक समीक्षकांनी वेगवेगळ्या प्रमाणांनी सिद्ध केली आहे. परंतु डॉ. कोलत्यांनी येथे कालिदासाच्या प्रतिमेचा एक नवा पैलू रसिकांसमोर मांडला. या लेखात कालिदासाच्या तिन्ही नाटकांचे एका नव्या दृष्टीने केलेले रसिकावलोकन आहे. तत्कालीन रंगभूमी व रसिक यांच्या आवाहनासाठी कालिदासाने शृंगाररसानुकूल वातावरण निर्माण केले, यातील नावीन्य कोणीही नाकारणार नाही. पण हे उद्दीष्ट दाखविण्यासाठी उर्वशी, शकुंतला व मालविका यांना अनुक्रमे वेश्या, वेश्यापुत्री व तत्सदृश भूमिका अशी विशेषणे वहाल करणे हे काहीसे भडकपणाचे नाही काय ? नावीन्यावरोबर काहीसे भडक वर्णन नसेल तर ते कोलते कसले ?

शाकुंतलाचा पाचवा अंक

कालिदासाचे शाकुंतल नाटक ही एक सर्वश्रेष्ठ कलाकृती आहे याबद्दल विद्वानांचे मतैक्य असून त्याचा चौथा अंक हा सर्वश्रेष्ठ आहे हेही सर्वमान्य आहे. त्यातील रम्यतम असे श्लोकचतुष्टय कोणते याबद्दल मात्र आजवर काहीसा मतभेद होता; पण, डॉ. कोलते यांनी शाकुन्तलातील सर्वश्रेष्ठ अंक हाच मुळी चौथा नसून पाचवा होय हे मोठ्या मार्मिकपणाने पटवून दिले आहे. केवळ करुण रसाच्याच दृष्टीने पाहिले तरी पाठवणीच्या प्रसंगातील दुःखापेक्षा परित्यागाच्या प्रसंगातील दुःखाची तीव्रता किती तरी पटींनी अधिक असणार ! शिवाय, नाट्यमयता व रचनाचातुर्य या दृष्टींनीही चौथ्या आणि सहाव्या अंकाच्या मधील पाचवा अंक हा मेरुमणी होय; अर्थात—

काव्येषु नाटकं रम्यं तत्र रम्या शकुंतला
तत्रापि च चतुर्थोऽङ्कस्तत्र श्लोकचतुष्टयम् ।

या सुभाषितात केवळ 'सार' अलंकार साधण्यासाठीच चौथा अंक सर्वश्रेष्ठ ठरविला असून तत्रापि व चतुर्थोऽङ्कः हे केवळ अर्धसत्य होय ! पाचव्या अंकाचे रसग्रहण करण्याच्या निमित्ताने या लेखात डॉ. कोलत्यांनी या अर्धसत्यावर आवेशपूर्ण प्रहार केला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गतानुगतिक आणि परप्रत्ययनेय अशा समजुतींवर कठोर आघात करावा कोलत्यांनीच !

खाडिलकरांच्या नाट्ययशाचे रहस्य

' उत्तररामचरित आणि खाडिलकर ' या लेखात डॉ. कोलत्यांनी एक नवा मुद्दा मांडला आहे. आजवरच्या बहुतेक टीकाकारांनी खाडिलकरांवर शेक्सपिअर आणि कालिदास यांचा प्रभाव कसा पडला, हे परोपरीने सांगितले आहे. परंतु ' सवाई माधवराव यांचा मृत्यु ', ' कांचनगडची मोहना ', 'मानापमान', 'सवतीमत्सर', 'कीचकवध' आणि 'स्वयंवर', या खाडिलकरांच्या नाटकांतील आणि भवभूतीच्या नाटकांतील साम्यस्थळे दाखवून खाडिलकरांवर भवभूतीच्या नाटकांचा, विशेषत: उत्तररामचरिताचा, कसा परिणाम झाला आहे, याचे मार्मिक दिग्दर्शन येथे केले आहे. धीरोदात्त अशा आदर्श व्यक्ती निर्माण करण्याची स्फूर्ती खाडिलकरांनी उत्तररामचरितावरून घेतली हे अनुमान त्यांनी साकार सिद्ध केले. या लेखावरून डॉ. कोलत्यांचा नाट्यवाङ्मयाचा अभ्यास कसा सखोल आणि सूक्ष्म आहे, हे दृष्टीस पडते.

तुलनात्मक दृष्टीचे देणें असल्यामुळे अभ्यासलेल्या भिन्नभिन्न नाटकांतील वेचक साम्यस्थळांवर त्यांची दृष्टी नेमकी खिळते व त्या सूक्ष्म दृष्टीला नावीन्यपूर्ण मुद्दा सुचतो, याचा प्रत्यय 'खाडिलकरांचा सवाई माधवराव' या लेखातही येतो. शेक्सपिअरच्या हॅम्लेट व अथेल्लो या नाटकांवरून खाडिकरांचा सवाई माधवराव निर्माण झाला हे केवळ स्थूलमानानेच खरे आहे. वस्तुतः हॅम्लेट आणि अथेल्लो या दोहोंचे संपूर्ण मिश्रण म्हणजे सवाई माधवराव नसून दोघांच्या ठिकाणी असलेल्या केवळ गौण किंवा दुय्यम गुणांचा परिपाक म्हणजे सवाई माधवराव होय. हॅम्लेटची विकारवशता व अथेल्लोचा अंधविश्वासूपणा यांचेच तेवढे एकीकरण सवाई माधवरावांच्या भूमिकेत झाले आहे. हॅम्लेट जसा विचारवान आणि अथेल्लो जसा कणखर वृत्तीचा होता, तसा खाडिलकरांचा सवाई माधवराव उतरला आहे काय ? अर्थात नाही; मग त्याच्या व्यक्तिमत्वात या दोहोंचे संपूर्ण मिश्रण आहे, हे म्हणणे कसे पटणार ?

प्रा. बनहट्टींनी ' सवाई माधवराव यांचा मृत्यू ' या नाटकात खाडिलकरांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान म्हणजे 'राजा कालस्य कारणम्' याचे सार उमटले आहे असा विचार मांडला आहे. पण, या मताचे विवरण करून सवाई माधवरावाचे वैयक्तिक जीवनचित्र कलात्मक रीतीने रेखाटणे एवढेच उद्दिष्ट नाटककारासमोर होते, असा उत्तर-पक्ष डॉ. कोलते यांनी केला आहे. सवाई माधवरावाच्या स्वभावसिद्ध अवगुणांचा महाराष्ट्राच्या भाग्यनाशाशी अर्थाअर्थी काही संबंध नाही. तो जरी सद्‌गुणांचा पुतळा असता आणि त्या वेळी तो कोणत्याही कारणाने मेला असता, तरी भाग्यनाशाची परिस्थिती निर्माण झालीच असती. तो राजा म्हणून कमी पडला व त्याच्या अवगुणांमुळे नानांचे भगीरथ प्रयत्न फोल झाले, या बनहट्टींच्या मताचे कोलत्यांनी खंडन केले असून अशा कलात्मक व्यक्तिचित्रणाच्या नाटकाला राजकीय सिद्धान्ताची बैठक लावणे कसे गैर आहे, हा नवा मुद्दा मांडला आहे.

समीक्षेचा स्थायीभाव : नावीन्य

'भिमीची सवत' हे श्री. व्यं. शं. वकील यांचे दारूबंदीवरील एक सुंदर नाटक असून ते ' मूकनायक ', 'विद्याहरण' व 'एकच प्याला' या मद्यपानाचे दुष्परिणाम दाखविणाऱ्या तीनही प्रसिद्ध नाटकांहून कसे वरचढ आहे, याचे विवेचन केले आहे. वस्तुतः वकिलांचे हे नाटक काही तसे गाजलेले नाही, पण कोलत्यांच्या सूक्ष्म आणि तौलनिक दृष्टीला त्यातील परिणामकारतेची आणि कलात्मतेची प्रतीती आली आणि नाटककार छोटा असला तरी तो काही विशिष्ट गुणांच्या बाबतीत मोठ्यांहून मोठा आहे, हे त्यांनीं साधार पटवून दिले आहे.

'देवल व शारदा' या लेखात डॉ. कोलते यांनी या श्रेष्ठ कलाकृतीचे हार्द उकलून दाखविले असून शारदा नाटकाचे अगदी थोडक्यात पण यथार्थ मूल्यांकन केले आहे. तसेच, ' शूरां मी वंदिले ' या सुप्रसिद्ध नाट्यगीताचे त्यांनी केलेले रसग्रहण म्हणजे देशासाठी आत्मबलिदान करणाऱ्या शूर पुरुषांना वाहिलेली आदरांजली असून ती लेखकाच्या सूक्ष्म रसिकतेची व शौर्यप्रियतेची साक्ष देते.

डॉ. कोलत्यांचा नाट्यविषयक कोणताही लेख वाचा. काही ना काही नवीन सांगण्यासारखे असल्याशिवाय ते लेखणी हाती धरीत नाहीत याचा प्रत्यय येतो. 'नावीन्य' हा त्यांच्या समीक्षेचा स्थायी भाव असून स्वमतविषयक खंबीर भूमिका, आवेश, वकिली व काहीसा लक्ष्यवेधी भडकपणा हे त्यांचे संचारी भाव होत. डॉ. कोलत्यांच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लेखनातील नावीन्य हा स्थायी तुलनात्मक पद्धती आणि कलैक दृष्टी या विभावांनी व व्यक्तित्वाचे सूक्ष्म उद्घाटन, गुप्त रहस्याची उकल, सडेतोड विवेचन व ज्याचे श्रेय त्याला देणारी वृत्ती या अनुभवांनी परिपुष्ट आणि अभिव्यक्त होऊन त्याला उच्च कलात्मक समीक्षेची गोष्टी येते.

कठोर दोषदिग्दर्शन

याच गोडीची प्रत्ययकारिता त्यांच्या कादंबरीवरील समीक्षणातही येते. ' उषःकाल आणि वज्राघात ' या हरिभाऊ आपटचांच्या दोन कादंबऱ्यांची तुलना करतांना त्यांपैकी एक हरिभाऊंच्या ऐतिहासिक कादंबरीचा 'उषःकाल' तर दुसरी अशा लेखनावर 'वज्राघात' कशी ठरते याचे प्रतिपादन केले आहे. या दोहोंमध्ये साम्य-विरोधाच्या काही सूक्ष्म छटा कशा दडलेल्या आहेत हे सांगताना डॉ कोलत्यांच्या तौलनिक दृष्टीची सूक्ष्मता कळते. कादंबरीच्या नावावरील मनोज्ञ कोटी मार्मिक आहे. अर्थात, स्वमतप्रतिपादनाच्या हिरीरीत आधी कोटीसाठी थोडेसे भडक विधान करून नंतर त्याला समतोलपणाने मुरड घालण्याची लकबही येथे दृष्टीस पडते. कारण काही झाले तरी तुलना हा समीक्षाकाराच्या चोखंदळ वृत्तीचा विलास असून तो श्रेष्ठ कलाकृतींच्या बाबतीत नेहमीच अनिरुद्धपणे वावरू शकत नाही. 'उषःकाल' म्हणजे हरिभाऊंच्या ऐतिहासिक कादंबरीचा उदयकाल, हे जसे पटवून देता येते, तसे 'वज्राघात' या कादंबरीला सर्वस्वी सदोष ठरविणे हे कठीणच होणार !

पण 'रागिणीमधील कालविपर्यासा' सारखा एखादा मुद्दा एकदा पक्केपणी सिद्ध झाल्यानंतर तेथे कोलत्यांच्या ठिकाणी असलेली वकिली करामत प्रकर्षाने उसळून यावी यात नवल नाही. "कलावंताने ऐतिहासिक कालविपर्यास केला तरी चालेल, पण त्याच्या भूगोलाच्या चुका मात्र अक्षम्य होत" या उक्तीनुसार 'रागिणी'तील भौगोलिक कालविपर्यासावर डॉ. कोलत्यांनी अक्षरशः प्रहार केले आहेत, असे म्हटले तरी चालेल. रागिणीतील 'कटोह' प्रकरणात शुक्लपक्षातील चतुर्थीस रात्री नवाच्या सुमारास चंद्रोदय झाल्याचे वर्णन केले आहे, एवढे डॉ. कोलते, एल्एल्. बी. यांच्या लक्षात येण्यास उशीर ! मग त्यांच्यासमोर विख्यात तत्त्वचिंतक वामनराव जोशी आले तरी त्यांची कोण पर्वा करील ? श्री. वकिलांसारख्या विशेष प्रसिद्ध नसलेल्या नाटककाराला त्यांच्या सुंदर कलाकृतीबद्दलचे श्रेय देताना त्यांना जसा उत्साह वाटतो तद्वत् सुप्रसिद्ध ' रागिणी ' कर्त्याला दोषी ठरविताना व आरोपीची उलटतपासणी करून त्याच्या अपराधांचे माप पदरात घालताना आपल्या वाणीचा विलास दाखविण्याची त्यांना उर्मी येते. खुद्द वा. म. जोशी यांनाही हा लेख वाचून आपल्या दोषाबद्दल कबुलीजबाब द्यावा लागला, हे ज्ञाते वाचक जाणतातच.

डॉ. कोलते यांच्या भाषाशैलीची वैशिष्ट्ये

माडखोलकरांच्या ' भंगलेले देऊळ ' या कादंबरीला विस्तृत प्रस्तावना जोडताना प्रारंभी ही कादंबरी संयमाचे महत्त्व प्रतिपादन करण्यासाठी लिहिली हे सिद्ध केले असून हा बोध कलेची तंत्रे सांभाळून केलेला आहे; किंबहुना 'भंगलेले देऊळ' ही उपदेशपर कादंबरी या नात्याने कलापूर्णतेचा आदर्श नमुना आहे असा पूर्वपक्ष केला आहे. उत्तरपक्षात या कादंबरीतील कला-दोषांची उकल करताकरता तीतील अंगभूत दोषांमुळे कादंबरीला केवळ गालबोटच लागले नसून तिचा परिणाम वाचकांवर कसा वेगळाच होतो, याचे सडेतोड विवेचन केले आहे. हिचा मुख्य रचनादोष म्हणजे अंती केलेले विवाहसंस्थेवरील अनावश्यक व अप्रस्तुत भाष्य हा होय. पात्रमुखी किंवा आत्मकथनात्मक पद्धतीमुळे या कादंबरीला जशी अवीट गोडी आली, तसेच तीत काही अस्वाभाविक दोषही निर्माण झाले. ज्या मानिनीची ही आत्मकथा आहे तिने पुरुष हा भ्रमरवृत्तीचा आहे असा पूर्वग्रह करूनच ही कथा लिहावयास घेतली; पण हा सिद्धांत किंवा ' भंगलेले देऊळ ' या नावातून सूचित होणारा विवाहसंस्थेच्या इष्टानिष्टतेचा परिणाम ही कादंबरी वाचून अनुभवाला येत नाही. पात्रमुखी कादंबरीमुळे अनूचे मनोविश्लेषण हे एकांगी, सदोष व पूर्वग्रहदूषित वठले आहे. हे सांगून या कादंबरीतील साऱ्याच व्यक्तींचे जीवन कसे संकुचित आहे व व्यक्तित्व कसे मर्यादासंकुल आहे याचे दिग्दर्शन केले आहे. माडखोलकरांचे शब्दप्रभुत्व व भाषाभांडार यांचे डॉ. कोलते यांनी केलेले गुणग्रहण चोख असून ही कादंबरी कलादृष्ट्या कशी श्रेष्ठ ठरते याबद्दलचे प्रमाणपत्र त्यांनी मुक्तकंठाने बहाल केले आहे तसेच आपल्या परीक्षणाचा समारोपही त्यांनी मनस्वी सडेतोडपणाने केला आहे. आत्मवंचक, दुतोंडी आणि दुबळ्या अनूचे व्यक्तित्व निर्माण करून माडखोलकरांनी आधुनिक सुशिक्षित

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्त्रियांची पद्धतशीर विटंबना केली आहे, हा निष्कर्ष विदारकच नव्हे तर काय ?

आतापर्यन्त वर्णन केलेले डॉ. कोलत्यांच्या भाषा-शैलीचे सर्व विशेष कोणत्या एकाच ठिकाणी पाहावयाचे असल्यास ' भंगलेल्या देवळा 'ची प्रस्तावना वाचावी. नावीन्यपूर्ण रहस्योद्घाटन, व्यक्तित्वाची सखोल उकल, तुलनेची सूक्ष्म दृष्टी, गुणदोष-दिग्दर्शन आणि दोष दाखवूनही ज्याचे श्रेय त्याला देण्याचा प्रांजळपणा ही सर्व वैशिष्टये या लेखात एकसमवायाने व्यक्त झाली आहेत. अरूच्या मनोवृत्तीवर ओढलेले कोरडे, अनू आणि अनिरुद्ध यांच्या अयशस्वी मिश्रविवाहाची कारणमीमांसा, कादंबरीकारांच्या शब्ददोषांची व वाक्यरचनादोषांची त्यांनी दिलेली उदाहरणे वैशिष्टयपूर्ण आहेत.

अभिजात रसिकता आणि डोळस चिकित्सा

प्रस्तुत संग्रहात काव्यसमीक्षात्मक असे एकूण पाच लेख आहेत. 'कालिदासांची तीन काव्ये' या लेखात

सांगाया निज वल्लभेस वदला तो यक्ष जे जे घना
सीतेचा पतिला निरोप, रतिचा तो शोक भेदी मना

या वासुदेवशास्त्री खरे यांच्या 'उज्जयिनी-वर्णना' तील श्लोकार्धावरून यांनी 'मेघदूता' तील यक्षसंदेश, 'रघुवंशा' तील सीतेचा पतीला निरोप आणि 'कुमार संभवा' तील रतीचा शोक हे प्रसंग निवडून कालिदासाच्या काव्यत्रयीचे रसग्रहण केले आहे. हे तीन प्रसंग म्हणजे मानवी जीवनाचे करुणरम्य चित्रपट असून उदात्तता, गंभीरता आणि रमणीयता आणणाऱ्या तीन प्रमुख जीवनतत्त्वांची काव्यात्मक प्रतीके आहेत. विवाह, याग आणि मृत्यू या त्रिविध भावनांच्या तंतूंनी कालिदासाने आपल्या काव्यकथेचे महावस्त्र कसे विणले आहे त्याचे धागे-दोरे आपल्या हळूवार हातांनी उकलून दाखविले आहेत. हे करताना काव्यातील वेचक अव-तरणांच्या निवडीत डॉ. कोलत्यांची अभिजात रसिकता व्यक्त झाली आहे.

'तिवारी आणि टेकाडे' या लेखात आज जवळजवळ स्मृतिशेष झालेल्या या दोन सुविख्यात राष्ट्रीय कवींचे तुलनात्मक गुणग्रहण केले आहे. तुलनाशक्ती ही किती सखोल व मर्मग्राही असू शकते याची वानगी म्हणजेच हा लेख होय.

प्रा. या. मु. पाठक यांच्या 'शशिमोहन' चे परीक्षण हे केवळ रसग्रहण नव्हे. या टीकालेखात कोलत्यांमधील मराठीचा चिकित्सक प्राध्यापक जागृत झाला आहे. 'शशिमोहन' या नावापासून तो कवीने कल्पिलेल्या या काव्याच्या उद्दिष्टापर्यंत सर्व दोषस्थळे दाखविनान त्यांनी प्रशंसनीय गुणांचाही निर्देश केला.

'पिचलेला पावा आणि चौथीचा चांद' या संग्रहावरील प्रा. कोलते यांचे परीक्षण म्हणजे त्यांचे जीवश्च कण्ठश्च मित्र प्रा. म. श्री. पंडित यांच्या स्नेहाचे द्योतक असून त्यात कवीच्या अनेक गुणांचे जसे मनमोकळेपणाने उद्घाटन केले आहे तसे त्यांतील काही दोषही नजतेत आणून दिले आहेत. समकालीन कवीविषयी विशेषतः त्याच्या काव्याच्या अंतरंगाविषयी समीक्षकाला कसा जिव्हाळा वाटला पाहिजे, हे या लेखात दिसून येते.

'अर्वाचीन कविता' या लेखात केशवसुतांपासून आज-वरच्या नामवंत कवींच्या काव्यप्रवृत्तीचा आढावा घेतला आहे. 'केशवसुतांच्या संप्रदायाची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती ? १९२० ते १९४० या दुसऱ्या युगाला रवि-किरणमंडळाचे युग म्हणणे कितपत योग्य आहे ? या प्रश्नांची चर्चा करून उत्तरकालीन कवींपैकी बहुतेकांच्या प्रणयपर काव्यात आणि रचनाशैलीत तांब्यांचाच प्रभाव कसा दिसून येतो, याचे दिग्दर्शन केले आहे. बहुतेक थोर कवींचे प्रमुखविशेष सांगुन क्रांतिकारी कवींचा रुद्र संप्रदाय निर्माण करण्याचे श्रेय तांब्यकडे कसे जाते याचे डॉ. कोलते यांनी केलेले विवेचन लक्षात घेण्या-सारखे आहे.

तिवारी आणि टेकाडे, रागिणीतील कालविपर्यास आणि शशिमोहन हे लेख कोलते यांनी विद्यार्थीदशेत असतानाच लिहिले. अर्थात ललितवाङ्मय वाचून त्याची निवड करण्याचा व आपल्याला आवडलेल्या कृतीची डोळस पण परिश्रमपूर्वक समीक्षा करण्याचा छंद त्यांच्या ठिकाणी मूळचाच आहे याबद्दल शंका उरत नाही.

मराठी समीक्षा-वाङ्मयातील स्थान

मराठीत ललित वाङ्मयाच्या इतर सर्व प्रकारांप्रमाणे 'समीक्षा' हा प्रकारही अलीकडेच विकसित झाला आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'ग्रंथांवरील टीका' या आपल्या निबंधात प्रामुख्याने गुणदोष-विवेचनात्मक टीकेचाच निर्देश केला व टीकाकाराच्या अंगी आवश्यक असणारे गुण कोणते याची चर्चा केली. पण, एका दृष्टीने विष्णुशास्त्री हेच आजच्या भरास आलेल्या वङ्मयीन

(पान ६४ वर)

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी साहित्यातील तत्त्वचिंतक मुनी
कै. वामन मल्हार जोशी

प्रा. अनन्त अडावदकर

वीस जुलै म्हणजे वामन मल्हार जोशी यांची पुण्यतिथी! पण दरवर्षी पुण्यस्मरण होण्याचे भाग्य ज्या मराठी साहित्यिकांना मिळाले त्यांच्यात वामन मल्हारांचे नाव नाही. अर्थात अज्ञातन्हेची सामान्यांकडूनही लोकप्रियता मिळण्यासारखे त्यांचे साहित्यही नाही. सर्व सामान्य माणसाला दूरस्थ वाटणारा तत्त्वज्ञानाचा प्रांतत्र त्यांना आपला वाटला. आणि कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी त्यांना दिलेला "तात्विक कादंबरीचे जनक" हा किताब त्यांना गौरवाचा ठरण्याऐवजी सामान्यांपासून दूर नेता झाला. त्यांच्या हयातीतच त्यांच्या समग्र साहित्याचे नीट अवलोकन करण्याऐवजी, त्यांच्या समतोल विचार करण्याच्या पद्धतीचा संशयात्मा म्हणून उपहास करणारा एक वर्ग निर्माण झाला होता. वास्तविक, "कुठल्याही विषयाला दोन बाजू असतात आणि त्या दोहोंतही थोडे फार सत्य असते" हे जाणून घेण्यासाठी माणसाचे मन मोठे असावे लागते. कै. वामनराव जोश्यांच्या मनोभूमिकेबद्दल खांडेकर म्हणतात, "......दुसऱ्या बाजूची प्रामाणिक जाणीव, मानवी मनाच्या अपूर्णतेची खात्री हा जो त्यांचा गुण तोच लोकांच्या दृष्टीने अवगुण ठरला......पण खरोखर तो त्यांचा संशयवाद नव्हता. तात्विकदृष्ट्या तो त्यांचा सौजन्यवाद होता." स्वतः वामनरावांनाही हीच खंत होती की, "सर्व बाजूंच सहानुभूतिपूर्वक विचार करण्याची माझी जी वृत्ती तिचे महत्व अद्यापी पुष्कळ लोकांना कळलेले नाही."

खरोखर वामन मल्हारांचा पिंड समन्वयवादी-सुवर्णमध्य शोधणारा-असा होता. त्यांचे व्यक्तिमत्व शांत, सोज्वळ व कलाप्रिय होते, तशीच त्यांची कला, साहित्य व जीवनविषयक विचारसरणी होती. त्यांना साहित्यात सत्य, सौजन्य व सौंदर्य यांचे संतुलन हवे होते. यातील एकाही अंगाचा अतिरेक त्यांना नको होता. स्वतःच्या साहित्यातही त्यांनी हाच तोल सांभाळण्याचा प्रयत्न केला. हे करीत असताना साहजिकच तथाकथित कलाकाराप्रमाणे त्यांनी आपल्या साहित्यांत सौंदर्याची नेत्रदीपक आरास मांडली नाही. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी म्हणूनच त्यांच्यावर सौंदर्याच्या आराधनेत तितकीशी निष्ठा प्रकट न केल्याचा आरोप केला आहे. परंतु तेच डॉ. अ. ना. पुढे हेही पण मान्य करतात की, "वा. म. जोशी जरी कलावैभव वाढवू शकले नाहीत तरी मराठी कादंबरीचे तत्त्ववैभव वाढविण्यात....त्यांनी स्पृहणीय आणि **वंदनीय** (अधोरेखा माझा) यश मिळविले यात शंका नाही." वामनरावांनी आपले सारे तत्त्वज्ञान ललित साहित्याच्या द्वारे प्रगट केले आहे. त्यांच्या हेतूची दिशा अशी-ते म्हणतात, "मी वाचकांना....सद्विचार करण्याची व ओळखण्याची तसेच सद्भावनांनी प्रेरित होण्याची व त्यांची मूल्य मीमांसा करण्याची शक्ती दिली असली.... तरी मला धन्यता वाटेल." असे करण्या साठीच त्यांच्या ललित साहित्याचा एवढा व्याप होता!

तरी देखील काव्य सोडल्यास कथा, गुजगोष्ट, कादंबरी, टीका व नाटक अशा सर्व शाखांमध्ये त्यांनी लिखाण केले. त्यांकी रागिणी, सुशीलेचा देव, आश्रम हरिणी व इंदु काळे-सरला भोळे या चार कादंबऱ्याच खूप चर्चिल्या गेल्या आहेत. या चारही कादंबऱ्यांचा प्रमुख विषय 'स्त्री, तिचे शिक्षण व त्यामुळे निर्माण होणारे प्रश्न' हाच आहे. कै. हरिभाऊंनी रूढीग्रस्त मराठी स्त्रीवर प्रकाश टाकून तिची दुःखे वेशीवर टांगली; तर वामन मल्हारांनी नव्याने शिकू लागलेल्या मराठी स्त्रीची वैशिष्टये टिपली. पतिनिष्ठ सरला व रागिणी, स्वतंत्र वृत्तीच्या उत्तरा व सुशीला आणि

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कलासवत कमला व इंदु काळे, या त्यांच्या मानसकन्या तत्कालीन मराठी स्त्रीचे प्रतिनिधित्व करतात. वामनरावांना सुशिक्षित स्त्रीची नुसतीच प्रशंसा किंवा नुसतीच निर्भत्सनाही करायची नव्हती. त्यांची या नव्या स्त्रीकडे पाहण्याची दृष्टी समंजस हितचिंतकाची होती. म्हणूनच त्यांना तिचा उतावळा स्वभाव, संकुचित दुराग्रह, पुरूषाशी स्पर्धा करण्याची जिद्द इ. गोष्टी-बरोबरचतिची स्वतंत्र प्रज्ञा, ध्येयप्रवणता व त्यागी वृत्ती यांचीही जाणीव होती. स्त्री-स्वातंत्र्य व कला जर तिच्या नीतीच्या आड येत असतील तर कलेला तेथेच आवर घातला पाहिजे हे त्यांनी "इंदु काळे सरला भोळे" मध्ये प्रतिपादिले आहे.

आश्रमहरिणी ही त्यांची थोडी वेगळ्या प्रकारची कादंबरी आहे. तिच्यातील आश्रमाचे दूरस्थ वातावरण व एकंदरीत कल्पना रम्यता आकर्षक आहे. त्यामुळेच अनेकांनी तिला त्यांची सर्वश्रेष्ट कादंबरी ठरविली आहे. त्यात त्यांनी द्विपतिकत्वाचे प्रतिपादन केले आहे. परंतु नवीन तत्वाचे प्रतिपादन करताना ते आवेश आणीत नाहीत, तर उलट सौजन्यच प्रगट करतात. त्यामुळे त्यांच्या तत्वप्रतिपादनात केतकरांच्या सारखी रूक्षता येत नाही. एकप्रकारचा ओलावा येतो.

स्मृतिलहरी हे पुस्तक त्यांच्या व्यक्तित्वातील हा ओलसरपणा अधिक प्रगट करते. त्यांच्या साहित्यातली ही 'चिमुरडी पोरटी' (शब्द वि. स. खांडेकरांचा) मोठी चतुर आहे. गुजगोष्टीवजा या ललित लेखाची बैठक भावनात्मक आहे. वामनरावांमधील तत्वज्ञ आणि विनोदकार दोन्ही येथे प्रगट झाले आहेत. 'स्मृतिलहरीं' तील सूक्ष्म विनोद व घरगुती वातावरण आपणास आपल्या मनात डोकायला लावतात. आत्म-परीक्षण करायला लावतात.

शैली व मर्यादा

वामनरावांच्या व्यक्तिमत्वाचा त्यांच्या लिखाणावर स्वाभाविकच परिणाम झाला आहे. त्यांचे व्यक्तिमत्व अंतर्मुख होते. त्यामुळेच ते लिखाणात देखील बाह्य वर्णनाऐवजी एकदम अंतरंगालाच हात घालतात. शारीरिक तपशीलाऐवजी मनोविचारांचे दर्शनच ते घडवतात. लिखाणात वाचकांचा विचार क्वचितच केला असल्याचे दिसते. "सुचले तसे लिहिले" या त्यांच्या वाक्यामुळे भाषा वगैरेत सजावटीचा भाग मुळीच नाही. ललित साहित्याला विचारप्रदानाचे केवळ साधन मानल्यामुळे ते नेहमी एखाद्या व्याख्यात्यासारखे त्यात डोकावतात. ललित लेखनात आवश्यक असलेली तटस्थता न साधल्यामुळेच नाट्यलेखन त्यांना जमले नाही. अपवादवजा "खिस्ताचा खेळ" हे एक नाटक त्यांच्या जमेस आहे. त्यांच्या या दोषामुळेच "इंदु काळे सरला भोळे" या कादंबरीतील सर्वांच्या पत्रलेखनात एकाच प्रकारची भाषाशैली आढळते. एका ठिकाणी मात्र या दोषाचाही त्यांनी चांगल्यारीतीने उपयोग करून घेतला. "मुशीलेचा देव" या कादंबरीत वा. म. जोशी हे एक पात्रच टाकून त्यांनी अतिशय सुंदर रीतीने वास्तवाचा आभास निर्माण केला. अर्थात तरीही त्यांच्या तटस्थ्याच्या अभावामुळे त्यांच्या पात्रांना स्वतंत्रपणे जगणे कठीण झाले आहे ही गोष्ट नाकारता येत नाही.

तसेच ज्या तत्त्वचर्चेविषयी त्यांची ख्याती आहे ती तत्त्वचर्चाही केवळ "चर्चा" च अधिक वाटत नाही का ? व्यक्तिशः मला तरी तिचे स्वरूप आरामशीर गप्पांसारखे (easy chair talk) वाटते. त्यात तत्त्वां-विषयीची आत्यंतिक आस्था असल्याचे क्वचितच जाणवते.

या सर्व मर्यादांचा विचार करूनही वामन मल्हारांची स्वतःची अशी खास शैली असल्याचे विसरता येणार नाही. त्यांच्या शैलीत प्रसाद गुण आहे. केळकरांची कल्पनाचतुरी आणि फडक्यांची सफाई यांचा सुरेख संगम त्यांच्या भाषा शैलीत झाला आहे. त्यांच्या स्वभाव रेखाटनाची पद्धती ही, प्रा. वा. ल. कुळकर्णी म्हणतात त्याप्रमाणे निरूपणात्मक कल्पनाशक्तीची आहे. तर वि. स. खांडेकरांना वामनरावांच्या शैलीत-"हरिभाऊंप्रमाणे सागराची विशालता वा फडक्यांप्रमाणे तलावाची रेखीवता नसली तरी ती एक लहानशी गंगा" असल्याचा भास होतो.

खांडेकर त्यांच्या (वा. म. जोश्यांच्या) मराठी साहित्यातील स्थानाविषयी विचार करतांना मार्मिकपणे लिहितात की, "मराठी साहित्यात त्यांचा क्रमांक कुठेही लागला तरी....ख्रिस्त आणि बुद्ध, एकनाथ आणि तुकाराम, आगरकर आणि गांधी यांच्याच वर्गात महाराष्ट्राचे भावी इतिहासकार त्यांचे नाव घालतील,

(पान ५८ वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असेल निशा काळी.... काळी....

प्रा. कृष्णा चौधरी

मुक्तिबोध म्हटले म्हणजे आपणापुढे उपेक्षितांच्या वेदनांना वाचा फोडणाऱ्या, साम्यवादी जाणिवांनी पीळ पडलेल्या, पण या दुःखातूनही उद्याचा भविष्यकाळ घडवू पाहणाऱ्या एका दुर्दम्य आशावादी कवीचे चित्र उभे राहते. मुक्तिबोधांची कविता वाचून ही प्रतिक्रिया झाल्यास नवल नाही. मुक्तिबोधांच्या कवितेतील उत्कट, प्रखर सामाजिक जाणीव हे एक प्रमुख केंद्र. शरच्चंद्रांच्या या सामाजिक जाणिवेच्या केंद्राचाच विचार प्रामुख्याने मराठी समीक्षेत झाला. मुक्तिबोधांच्या बाबतीत एक गोष्ट मात्र मराठी समीक्षक विसरला. ती म्हणजे मुक्तिबोधांजवळ तितक्याच उत्कटत्वाने असणाऱ्या दुसऱ्याही केंद्राची. हे दुसरे केंद्र म्हणजे मुक्तिबोधांची उत्कट संवेदनक्षम सौंदर्यवादी वृत्ती !

शरच्चंद्रांनी मराठीत जशी साम्यवादी वृत्ती आणली तशीच निर्लेप प्रणयरम्य सौंदर्यवादी वृत्तीही ! या दोन्ही मुक्तिबोधी प्रवाहांनी मराठी कविता जीवनदर्शन व सौंदर्यदर्शनाच्या बाबतीत अधिक विकसित झाली.

"असेल निशा काळी काळी" मुक्तिबोधांच्या प्रणय-व सौंदर्यवादी वृत्तीचा असाच एक उत्कट आविष्कार. तसे पाहिले तर मुक्तिबोधांनी या कवितेत काही नवे सांगितले नाही. परंपरागत प्रीतीची भावनाच या कवितेतून प्रकट झालेली असूनही ही कविता आपले मन वेधून घेते ती तिच्यातील नाविन्यामुळे नव्हे तर तिच्यातील निर्लेप संवेदनक्षम वृत्तीमुळे ! मराठी कवितेला प्रीतीचा अनुभव काही अनोखा नाही. कंटाळा येईल इतक्या प्रीतिकविता मराठी कवींनी लिहिलेल्या आहेत. कारण मराठी कवितेंत प्रीतिकवितांची ही लागवण चांगल्या रीतीने झाली, असे त्या कविता वाचून वाटत नाही. आज लिहिल्या जात असलेल्या बहुसंख्यांक कवितेतील प्रीतीचा अनुभवच अस्सल वाटत नाही. तिच्यामध्ये नाविन्य जागवते ते तिच्यामध्ये असणाऱ्या अभिव्यक्तिकौशल्यामुळे. कधी कधी तर हे अभिव्यक्तिकौशल्यही उसने घेतलेले असते.

या संदर्भात शरच्चंद्रांची भूमिका मात्र वेगळी आहे. त्यांची कविता आपले लक्ष कायमचे आपल्याकडे वेधून घेते ती तिच्यातील आविष्कारसामर्थ्यामुळे नव्हे, तर सकस अनुभवविश्वामुळे. आजच्या अनेक मान्यवर कवींनीही प्रीतीच्या बाबतीत आपले अनुभव व्यक्त करतांना तिला वेगडी स्वरूप दिले. अनेकांनी तिला अलंकरणाने नटविले व त्यामुळे ते तिच्यातील उरलेसुरले काव्यही गमावून बसले. अनेकांनी तिला व्यक्त करण्यास निसर्गाचा आश्रय घेतला तर अनेकांनी पौराणिक संदर्भांचा. मुक्तिबोधांच्या प्रीतिकवितेचे आगळेपण कशात असेल तर तिच्या संदर्भरहिततेत. (नाही म्हणायला सामाजिक जाणिवेचा संदर्भ तिच्यातून केव्हाही दाखविता येईल.)

शरच्चंद्रांची प्रीतिकविता आपले अनुभवविश्व कशाचाही फारसा आश्रय न घेता आपल्या जाणिवा व्यक्त करते. त्यांच्या जाणिवातही आपणाला मोहून टाकतो तो तिच्यातील निर्लेपपणा. आपल्याला आलेल्या निर्लेप संवेदना ती तितक्याच अलिप्ततेने व्यक्त करते. 'असेल निशा काळी काळी' हा मुक्तिबोधांच्या प्रणयरम्य मनोवृत्तीचा उत्कट व सौंदर्यशाली आविष्कार ! रात्र काळी, त्यातल्या त्यांत आकाशात एकही तारा नसावा. पण त्यातही कवीला "ती" उभी असल्यामुळे आपल्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीवनातील अमावस्या नाहीशी होत असल्याचा साक्षात्कार होतो. शरच्चंद्रांना तिच्याविषयी वाटणारा युगायुगांचा आत्मविश्वास ते किती साध्या शब्दात व्यक्त करतात :

> **असेल निशा काळी काळी**
> **नसेल तारा एकहि –**
> **अशीच तूं उभी राहा**
> **माझी अभा जाईलहि !**

प्रीतीला काळ्या रात्रीपेक्षा मराठी कवितेत चांदणेच अधिक मानवलेले दिसते. त्यातल्या त्यात तेही शरदातील. अर्थातच कुठेच कुणी बोलत नसून केवळ एकाकिनी असणाऱ्या काळ्या कभिन्न रात्री आमच्या मराठी कवींना का मानवाव्या ? शरच्चंद्र मात्र अशा एकाकिनी रात्रीतही "तिला" आपले गूज सांगण्याची, तिच्यावरील जीवापाड प्रेमामुळेच विनंती करतात. अशा एकाकी व भयाण रात्रीही तिचे गूज मात्र आपली शेवटपर्यंत सोबत करील ही जाणीव कवी किती साध्या शब्दात व्यक्त करतात :

> **असेल निशा एकाकिनी**
> **कुठें कुणी बोलत नसेल**
> **तुझेच गूज सांग ना**
> **त्याची मला सोबत असेल.**

अलीकडच्या काव्यातून नव्या प्रतिमा व्यक्त होत असतात. या व्यक्त होणाऱ्या नव्या प्रतिमा हे आजच्या नवकाव्याचे एक व्यवच्छेदक लक्षण सांगण्यात येते. म्हणूनच आजची बहुसंख्याक नवकविता प्रतिमासंकराने लडबडलेली दिसते.

आकाशात एकही तारा नसणाऱ्या काळघाकुट्ट एकाकिनी व भिजून चिंब झालेल्या रात्री, सारे सारे पुसून गेले असताना, म्हणजेच कवीच्या दृष्टीने जगांतील सर्व आदर्श नष्ट झाले असतांना व सर्व स्वप्नांना तडा गेल्यामुळं कवीजवळ एकच आत्मसामर्थ्याचे बळ उरते व ते म्हणजे तिच्या जिवाचा दिवा ! या दिव्याने कवी अशा अवस्थेतही जगाचा शोध घेण्याची इच्छा करतो. हा दिव्य प्रीतीचा एकच एक दिवाच आपल्याला अशा अंधःकारातही प्रकाश दाखवू शकेल असे कवीला वाटते, म्हणूनच

> **दिशा काळ्या कभिन्न अन्**
> **सारे सारे जाता पुसून**
> **जिवा तुझा दिवा घेऊन**
> **जगास या बघेन मी.**

नाही म्हणायला मुक्तिबोधांच्या या कवितेत एक प्रतिमा आलेली आहे; ती म्हणजे रात्रीची. रात्रीची ही प्रतिमा या कवितेत जीवनाची संदर्भसूचक म्हणून आलेली आहे. ही निशा भिजून काळीकाळी, एकाकिनी, भिजून चिंब असणारी. मुक्तिबोधांजवळ शब्दांचे सौंदर्य नाही असे म्हटले जाते. पण या कवितेत मुक्तिबोधांनी केलेली शब्दांची जादू पाहावी. त्यांच्या शब्दात अर्थ-सौंदर्याची व रचनाकौशल्याची अशी एक संघटनात्मक लय आहे. म्हणूनच कवीने जीवनातील नैराश्य या कवितेतून अधिकाधिक गडद केलेले आहे.

या कवितेत जीवनातील नैराश्य कवीने अधिकाधिक गडद करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पुढे तर भिजून चिंब असणाऱ्या या रात्री वाराही स्फुंदत असतो, तेव्हा तर जीवनाच्या संदर्भसूचक या प्रतिमेला अधिकाधिक अर्थ प्राप्त होत जातो. जीवनातील एकाकीपणा व भीषणता अधिकाधिक स्पष्ट होत जाऊन कवीच्या व्यापक जाणिवेमुळे मात्र कवितेतील प्रतिमेचे शेवटी प्रतीकात रूपांतर होते. मुक्तिबोधांची 'असेल निशा काळी काळी' एका व्यापक जाणिवेचा व समर्थ प्रतीकाचाच आविष्कार !

––––

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचे अध्यापनात लोकसाहित्याचे महत्त्व

वि. वा. जोशी

अक्षरलिपी अस्तित्वांत आली त्यापूर्वी किती तरी वर्षापासून लोकसाहित्य प्रचारांत होते, व ते बहुजन-समाजाच्या जिव्हेवर नाचत होते. अजूनहि ते निरक्षर लोकांच्या जगात स्वैर व स्वच्छंदपणे वावरत आहे. तो त्यांचा अेक अत्यंत अपूर्वाईचा व आनंदाचा मौलिक ठेवा आहे.

साक्षरता प्रसार जसजसा होऊ लागला, आणि ठिक-ठिकाणी विद्यामंदिरे स्थापन होत गेली व ती विस्तार पावू लागली, तसतसे अक्षर साहित्य विविध रूपाने प्रस्तुत होत गेले. त्यात गद्य, पद्य, निबंध, कथा, नाट्य, विज्ञान आदि अनेक प्रकार अस्तित्वात आले व त्यांचे अध्ययन-अध्यापन सुरू झाले. त्याला अेक वैचारिक बैठक प्राप्त होऊ लागली. तिचा उत्तरोत्तर विकास होत गेला. भारतातीलच नव्हे तर साऱ्या विश्वातील भाषांत थोडयाफार फरकाने हे यथाक्रम घडत गेले.

आपली मराठी भाषा गिर्वाण (संस्कृत) भाषेतून उदयास आली आणि तिला प्राकृत स्वरूप प्राप्त झाले. कालमानाने फरक होत गेला. आणि पौराणिक काल, ऐतिहासिक, संत आणि सांप्रदायिक काळा-नंतर तिला अेक सामाजिक स्वरूप प्राप्त झाले. याच सामाजिक काळाच्या प्रथमावस्थेंत कांही वर्षे पार-तंत्र्यांत तिला वागावे लागले. तिचाहि या मराठी भाषे-वर जो परिणाम झाला तो सुद्धा स्पष्टपणे आढळून येईल. देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले तरी आपली मराठी भाषा पूर्णतया अजूनहि स्वतंत्र झाली नाही; त्या प्रयत्नांत आपण आज धडपडत पुढे चाललो आहोत. मराठी अध्यापनाच्या द्वारे ह्या भाषेचे क्षेत्र व्यापक कर-ण्यासाठी अनेक शिक्षणतज्ञ मंडळी आणि राज्य सरकार झटत आहे. आणि ह्या मराठी भाषेचा उत्कर्ष कसा होईल याची विविध स्वरूपाच्या विचारविनिमयाद्वारे चर्चा चालू आहे. आजहि येथे या महाराष्ट्र राज्यांत वारंवार चर्चासत्रे घेण्यात येत असून ह्या महत्त्वाच्या विषयावर निरनिराळ्या तज्ञ व्यक्तींकडून विचारांचे आदानप्रदान होत असते. अशा वेळी 'लोकसाहित्य' हा विषयहि त्यांत समाविष्ट केला गेला तर काही वावगे होणार नाही.

लोकसाहित्याचे मराठी अक्षर वाङ्मयात स्थूल मानाने जे प्रथमागमन झाले ते कै. विष्णुशास्त्री चिप-ळूणकरांच्या निबंधमालेत, असे मानण्यांत येते; आणि त्यानंतर ते अनेक स्त्री-पुरुषांनी संघटित करून व यथा-शक्य प्रसिद्धी देऊन व काही ग्रंथद्वारा प्रकाशित करून उजेडात आणण्याचा प्रयत्न केला. त्यात प्रामुख्याने श्री. शं. रा. दाते, राजवाडे, कै. रावसाहेब ना. गो. चाफेकर, सुखटणकर (वि. स.), सौ. मालतीबाई दांडेकर, सौ. अनुसयाबाई लिमये, विमल चोरघडे, डॉ. कमला-बाई देशपांडे, डॉ. सरोजिनीबाई बाबर, डॉ. दुर्गाताई भागवत, श्री. वामनराव चोरघडे, श्री. पां. श्री. गोरे, श्री. ना. रा. शेंडे, श्री. वा. ना. विगम आणि अशा कितीतरी व्यक्तींचा उल्लेख करतां येईल. डॉ. पाटील, भालेराव, पोहनेरकर, प्रा. गजमल माळी प्रभृती मराठ-वाड्यातील मंडळीहि त्यात समाविष्ट आहेत आणि आताच्या विशाल महाराष्ट्रामुळे पूर्वीच्या विदर्भ मराठ-वाडा व मुंबई मधील विभक्तपणाही नष्ट झालेला आहे.

वर निर्दिष्ट केलेल्या व्यक्तिगत प्रयत्नांबरोबर सर-कारनेहि या बाबतीत लक्ष घालून सन १९५८–५९ पासून लोकसाहित्य समिति पुणे येथें स्थापन केली आणि लोकसाहित्य संकलनाम वाव प्राप्त करून दिलेला आहे. त्या समितीचे कार्य उत्तरोत्तर वाढत चाललेले असून दरवर्षी होणाऱ्या ग्रंथप्रकाशनाद्वारे सर्वांच्याच परिचयाचे झाले आहे.

लोकसाहित्याच्या बाबतीत इथवर प्रयत्न होऊनहि त्याचा शैक्षणिक क्षेत्रात अजूनहि समावेश नाही, हे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्या प्रामुख्याने प्रत्ययास येईल. एरवी हा विषय केव्हाचाच प्राथमिक शाळांपासून महाविद्यालयीन शिक्षणक्रमांत समाविष्ट व्हावयाला हवा होता.

लोकसाहित्य संकलन म्हणजे आजोबा-आजीबाई किंवा वडीलबाऱ्या माणसांनी सांगितलेली कथा, गाणी, उखाणे, म्हणी, कोडी किंवा देवदेवतांची अद्‌भुतरम्य व चमत्कृतिजनक अशी परंपरागत वाङमयकृती एकत्रित करणे अेवढेच त्याचे कार्य मर्यादित नाही, तर ते एक शास्त्र आहे. त्याचे अध्ययन आणि अध्यापन दोन्हीहि शिक्षण क्षेत्रांत अगत्याचे आहे, याविषयी अजूनपर्यंत विचार झालेला नाही ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

तसे पाहू जाता लोकसाहित्यांत प्रचलित सर्व कृतींचा समावेश असल्याचे दिसून येईल. त्यात रसालंकार आहे. भक्तीपर वाङमय आहे. कथा–गीतांचे तर केवढे भांडार आढळून येईल, इतकेच नव्हे तर नाटयनृत्यादि प्रकारहि भरपूर आहेत. पण अजूनहि लोकसाहित्य शिक्षणाचे माध्यम होऊ शकले नाही; इतकेच नव्हे तर आजपर्यंत इतःस्ततः विखुरलेल्या ह्या अमोल ठेव्याचे ग्रंथबद्ध शास्त्र (लोकसाहित्य–शास्त्र) होऊ शकले नाही. ह्या विषयाचे डॉक्टरेट किंवा पी. एच. डी. मिळविण्यासाठी आपल्या मराठी भाषेतून जे चार दोन प्रयत्न झालेत ते ग्रंथसुद्धां लोकसाहित्याच्या अध्यापनाला उपयुक्त ठरू शकले नाहीत. विश्वविद्यालयीन वातावरणात त्याला त्यांच्या नामोल्लेखाशिवाय कुठेच स्थान नाहीं.

वास्तविक लोकसाहित्यात शैशव, कौमार्य, तारुण्य, प्रौढत्व आणि वृद्धत्व अशा ज्या अनेक संपन्न अवस्था प्रचलित आहेत, तदनुषंगाने त्या त्या अवस्थेतील विपुल वाङमयाचा गुणानुसार व क्रमवार बालमंदिरापासून महाविद्यालयांपर्यंत अध्ययनासाठी प्रवेश व्हावयास अडचण नसावी. अनेक दृष्टींनी ते वाङमय परिपूर्ण व समृद्ध आहे, त्याचा निराळा उहापोह करण्याचेहि येथें प्रयोजन नाही, त्यांत रस, अलंकार, भावनोत्कटता, विविध कल्पनांनी व वर्णनांनी नटलेले समाजजीवन. साहित्य, काव्य नाटय, नृत्य, संगितादि सर्व प्रकार समाविष्ट आहेत. पण कुठल्याहि क्षेत्रांतील अभ्यासक्रमांत त्याला निवडून फेकलेल्या खड्याप्रमाणे टाकले गेलेले आहे. आणि ह्यामुळे लोकसाहित्याची अलीकडील काही वर्षांत तीस चाळीस (कदाचित यापेक्षाहि कमीच) पुस्तकांची त्यांत भर पडून वृद्धी झाली असली तरी ती कांही यथार्थाने अभिवृद्धी नव्हे.

आता हा विषय शिक्षणक्रमात कशा प्रकारे समाविष्ट करता येईल व त्याविषयी सर्वसामान्य गोडी निर्माण करण्यांत येऊन तो अध्यापनाचा अगत्यपूर्ण विषय कसा बनेल हे विचारवन्त शिक्षणतज्ञांनी ठरविण्याची वेळ आलेली आहे. आजच्या मराठीच्या अध्यापनात ह्या विषयाचेहि महत्त्वाचे स्थान आहे या विषयी दुमत असू नये असेच कुणालाहि वाटेल.

अेकदा हा विषय शिक्षणक्षेत्रात समाविष्ट करण्यात आला आणि त्याचे बालमंदिर, प्राथमिक शाळा, माध्यमिक वर्ग व महाविद्यालयातून यथाक्रम अध्ययन होत गेले तर प्रस्तुत लोकसाहित्य निर्मितीला एक मोठीच चालना मिळेल व ते लोण खेडयापाडयातून म्हणजे ग्रामीण जीवनापर्यंत पोचले गेले तर आज जी लोकवाङमय संकलनाची विकट समस्या आहे ती अनेक पटींनी सुधारेल, आणि लोकसाहित्याचे क्षेत्र उत्तरोत्तर व्यापक होत जाईल. त्यातून लोकजीवनाचे व लोकसंस्कृतीचे यथार्थ दर्शन घडेल; भाषेच्या आणि शब्दसंपत्तीच्या दृष्टीनेहि मोलाचे कार्य घडून येईल. "वाक्प्रचार आणि म्हणी" यामध्ये कितीतरी पटीने भर पडू शकेल व हे सर्व "लोकसाहित्य शास्त्राच्या" दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. ह्या साहित्याची व्युत्पत्ति, उद्‌गम आणि विकास कसकसा होत गेला व त्यावर कालमान परिस्थितीचा काय काय परिणाम झाला याचे परिशीलन करण्यास त्यायोगे वाव मिळेल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पै. खाँसाहेब बडे गुलामअली : एका शतकाचे गाणे

वामन इंगळे

खाँसाहेबांच्या जाण्याची बातमी रेडिओवरून ऐकली आणि क्षणभर सुन्न झालो. शतकाशतकातून एकदाच जन्माला येऊ शकणारी अशी दोन गुणी माणसे मृत्यूने एकाच शतकात अचूकपणे टिपली. पं ओंकारनाथ ठाकूर आणि आता खाँसाहेब बडे गुलामअली. जिवंत असेपर्यंत हा माणूस कधी मरू शकेल ही कल्पनाच आली नाही. तशी ती कुणाच्याच बाबतीत येत नाही. पण गुलामअली म्हणजे प्रत्यक्ष मेल्यावरही न मरणारी आसामी. तेव्हा आता गुलामअली गेले हे कसे खरे मानायचे.

मी त्यांना पहिल्यांदा पाहिले ते भारतीय नाट्यगृहाच्या रंगमंचावर. नाकी डोळी सुरेख असलेल्या गोऱ्यापान मुनवरअल्लीजवळ गोल टोपी घातलेली एक स्थूल आणि मिशाळ व्यक्ति बसली होती. मुनवरअलीने एक आवर्तन पूर्ण केल्यावर ती आकृती काहीशा मिष्किलपणे त्याला म्हणत होती– 'ए देखो मला....' आणि दुसऱ्याच क्षणी आकाशात प्रचंड विजांचा कडकडाट व्हावा तशी जबडयाची कराल तान धिम्या त्रितालाच्या समेवर येऊन आदळली आणि पुन्हा 'केदारात' आर्जवी विरहिणीचा नखरा साकार होऊ लागला. देह एखाद्या गवदुल शेठजीचा, पण त्या देहात लक्ष लक्ष उपजीचे आणि अविस्मरणीय गोडव्याचे कुंभ. विसंगतच. पण तसल्या ताकदीचे गाणे मी माझ्या आयुष्यात पुन्हा ऐकले नाही. असे म्हणताना अमीरखाँसाहेब, कुमार आणि ओंकारनाथ ठाकूर या युगप्रवर्तक गुणीजनांचा कुठलाही अवमान करण्याची माझी इच्छा नाही. हेही गाणे तितकेच परिपूर्ण आणि चमकदार. पण गुलामअलींचा 'सबरंग' काही आगळाच. गुलामअली म्हणजे एकेका मूलभूत वैशिष्ट्याचा उत्कर्ष. उत्कर्ष आणि अतिरेक (Extremity) या दोन्ही अर्थांनी खरे. त्यांच्याएवढी जबरदस्त जबडयाची तान मी कुणाच्याच तोंडून ऐकली नाही. ओंकारनाथांची तशी तान अनुनासिकाच्या स्पर्शामुळे जेवढी जिव्हारी लागावी तशी लागत नव्हती. अमीरखाँसाहेबांची तशी तान तर या सर्वांहून सुघटित आणि दमदार. पण तिला स्वरांच्या गाढ स्पर्शाभावी एक रुखेसुखेपणा आहे. कुमारांची तशी तान अधिक तल्लख, रचनेत अधिक विकट. पण जोरकस अभिव्यक्तीच्या वेळी त्यांचा दमसास कमी होतो. अर्थातच या अपयशाजवळही लुंग्यासुंग्याला जाता येणे अशक्य. गुलामअली तर अशा जबरदस्त तानेचे बादशहाच होते.

आवाजाच्या धर्माबाबतही असाच एकांडेपणा. जेवढा ढाला तेवढाच 'तार' उंचीचा आवाका. जितका लवचिक तेवढाच वजनदार. खर्ज किती सुरेख लागू शकतो हे पहायचे असेल तर ' कामदा ' मधील ' अंतरा ' या शब्दावर केलेली त्यांची कामगत पहावी. असा भास होतो की ऑर्गनच्या खर्जनरातून सुरांचा सुगंधी शिडकावा येतो आहे. म्हणून म्हणतो गुलामअलींचा आवाज हा या संपूर्ण संगीत शतकाचा आवाज आहे. शतकातल्या संपूर्ण आवाजधर्माचे पिळून काढलेले अत्तर म्हणजे गुलामअलींचा मर्द स्वर.

खाँसाहेब ज्या काळात प्रसिद्धीला आले त्याला मध्य कल्पून जर विचार केला तर आपल्याला ते दोन प्रवृत्तींच्या मध्यावर उभे दिसतात. त्यांच्या आधी होऊन गेलेल्या लहानमोठ्या गवयांचा अंतर्भाव मी पंडिती युगात करतो. भरपूर ज्ञानार्जन, शुद्धाशुद्धतेविषयीचा कर्मठपणा; व्याकरणाच्या सर्वांगाची भरपूर तयारी पण प्रत्यक्ष गायनात मात्र रसवत्ता आणि चैतन्याचा अभाव. (अब्दुलकरीम–रहिमतखाँ आणि अनेक सन्माननीय अपवाद.) खाँसाहेबानंतर प्रसिद्धी पावलेल्या गवयांनी त्यांच्या सर्व मूलभूत वैशिष्ट्यांना आत्मसात् करून गाणे अधिक चमकदार आणि लवचिक बनविले. पण खाँसाहेबांच्या बुलंद आवाजीचा वजनदारपणा आणि बोझ नसल्यामुळे त्यांना प्रति गुलामअली होता आले नाही. कुमारांनी भारताला क्रांतिकारी गाणे दिले हे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खरे आहे. पण त्या क्रांतीची स्पर्शचाहूल गुलामअलींनी करून दिली हे विसरून चालता येणार नाही.

आणि ठुमरी ? ठुमरी म्हणजे प्रत्यक्ष खाँसाहेब. मग 'का करू सजनी' असो, वा 'याद पियाकी आये' असो वा एका मुसलमान 'माणसाने' 'हरिओं तरसत' अशी तळमळून मारलेली आर्त हांक असो (अशी हिंदु-मुसलमान एकी राजकारणी माणसांच्या लाखो भाषणा-तूनही अभिव्यक्त झाली नसणार). त्यांची ठुमरी म्हणजे एक अस्सल खानदान लेणे. तशी ठुमरी आजपर्यंत कुणी गायिली नाही असे म्हणताना मला अब्दुल करीमांच्या 'पीके मीलन की आस' अथवा बापुराव पलुसकरांच्या ठुमरीवजा अतिशय समर्थ अशा भजनांची आठवण आहे. पण हे सर्व एका विशिष्ट भावप्रवृत्तीपुरते ठीक होते. अब्दुल करीम किंवा पलुसकर म्हणजे भक्तिरसाचा चिव आविष्कार, रसूलनबाई वा गिरीजादेवींची ठुमरी म्हणजे शृंगारिक मादकतेचे लसलसते कोंब. पण दुसरी भाव-वृत्ती तेवढी प्रगल्भ नाही. 'सबरंग' ची ठुमरी ढंगाने वैश्विक होती. म्हणजे तिच्यात हिंदु भजनातील आर्तता, मुसलमानी बेहस्तांतील रोमांचकारीपणा, अरब इराणात 'शिवरंजनी' रागात घुमणाऱ्या वाळवंटातील व माळ-रानावरील लकेरी आणि नेटक्या शृंगाराचा काजळ-काळा दिलखुलास नखरा– या साऱ्या विविध भाव-प्रवृत्तींना ठुमरीत बांधले ते गुलामअलींनी. दीपचंदीच्या आडव्या ठेक्यातून ठुमरीला धिम्या केरव्यात आणण्याचे बहुतेक श्रेयही त्यांचेच आहे. पण या विविध क्रांतिकारक वृत्तींना वरणारा सूर मात्र सोन्याच्या पात्राला जडवि-लेल्या मीनाकारीइतका बहुरंगी देखणा आणि सच्चा होता. त्यांना फक्त ठुमरीनवाझ ठरवून त्यांच्यातील भारदस्त ख्यालियाची अनेकदा थट्टाही झाली आहे. क्रांतिकारकाला थट्टेचे आणि निंदेचे भारतातच काय, अखिल विश्वातही कधीच उणे पडलेले नाही. फक्त त्यांनी (आता रेकॉर्डवरच भागवावं लागेल) ' अनोखा लाडला' किंवा 'सा मुंदर बन' हे ख्यालकाम गुलामअली ठुमरी गातच नव्हते अशी कल्पना करून पुन्हा ऐकावे –एवढेच.

म्हणून म्हणतो गुलामअलीचे गाणे हे या शतकाचे गाणे आहे. अमीरखांसाहेब, कुमार, फिरोज दस्तुर, लता या समकालीन श्रेष्ठ परंपरातून ते ऐतिहासिक-दृष्टचाही चिरंजीव होणार आहे. मुनवरअली, मीरा बॅनर्जी, जसराज, कासलीकर, कोकजे या नव्या कंठांतून ते पुन्हा ऐकावयास मिळणार आहे. यापैकी सगळेच काही 'पतियाळा' घराण्याचे पाईक नाहीत याची मला कल्पना आहे. पण यातूनच पुढे एखादा ' बडे ' बडे गुलामअली निर्माण होणार आहे. कारण त्या आका-शाची सावली भारतीय संगीताला टाळणे अशक्य आहे. म्हणूनच खाँसाहेबांच्या श्रेष्ठ आत्म्याला आपल्या सर्वांचा 'आदाब अर्ज'.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुस्तक परीक्षणे :

टिंब १, २, ३.

'टिंब' नावाचे नियतकालिक निघते असे अैकले होते. तेव्हा नव्या गोष्टींबद्दल असते ती उत्सुकता होती. व्यावसायिक मासिकापेक्षा वेगळे, जे सर्वसाधारणपणे छापून येणार नाही, परंतु प्रसिध्द न झाल्यास त्या लेखकावर व लेखनावर अन्याय झाला असता असे कांही वाचायला मिळेल अशी अपेक्षा होती.

आता फेब्रुवारी, मार्च व एप्रिल १९६८ मध्ये प्रसिद्ध झालेले अंक वाचायला मिळाले. तीनही अंक मिळून एकूण पृष्ठसंख्या ५२; मुखपृष्ठे धरून.

पहिल्या अंकात आपली मथुरा न्यारी कां? ह्याचा पोरकट खुलासा आहे. "हे रिकामचोट धंदे कोणी सांगितले?" ह्याला "तुमच्या बापाचं काय जातंय्" हे उत्तर. ही भूमिका. आमच्यापाशी पैसे आहेत, छापखानेवाले छापून देतात, आम्ही साक्षर आहोत, लिहितो (?) हा एकंदर सूर. "ज्ञानेशापासून–पिकासो पर्यन्त पेश करणं हे आमचं काम वस्स!" असे असतांना दोघांनाही लाज वाटावी इतका दर्जा. दुसऱ्या अंकात दखल घेतली गेली नाही म्हणून बोंब आणि तिसऱ्यात "बुरखा फाडणारे दोन व शे–सव्वाशे बुरखा पांघरणारे" अभिप्राय आल्याचे नमूद आहे. तर आपण काही तरी भलतेच सनसनाटी, मूलभूत करतो आहोत ही भूमिका. ह्यावर टिंबचा प्रपंच चाललेला आहे.

तीनहि अंकांत २५-२६ कविता व राजा ढाले ह्यांनी केलेले "माझे विद्यापीठ"चे परीक्षण, 'गती' व "हिरो आणि वाहुल्या" हे दोन लेख (?)

"डॉ. लोहिया" व "चार्ली चॅप्लिन" ह्या शिवाय तर कविता अगदीच सुमार. छंदांची नीट जाणहि लेखकांना नाही.

'माझे विद्यापीठ'चे परीक्षण सडेतोड आहे. परीक्षणाच्या अनुषंगाने कवितेचा अंतरात्मा वाहयात्मा ह्या बद्दलचे विवेचन ह्यामुळे ढाले इतरांपासून वेगळे पडतात. परीक्षणाचे अधिक परीक्षण करण्याची गरज नाही. एकूण ५२ पैंपानांकी २२ पाने ह्या परीक्षणाने घेतली आहेत.

"वाचा"

दुसरं पुस्तक "वाचा." त्याचा अंक दोन वाचायला मिळाला. अंकात कै. विठ्ठल रामजी शिंदे ह्यांच्या अप्रकाशित रोजनिशीतील पाने दिली आहेत. वाचतांना मौज वाटते.

ना. धो. महानोरांच्या "रानातल्या कविते"चे परीक्षण तु. शं. कुळकर्णी ह्यांनी केलेले व नरेश पळशीकर ह्यांची 'रिकामा' ही कथा हेहि अंकात आहे "रिकामा"त आजच्या एकंदर रितेपणाचं चित्रण सुबक, मोजकं आहे. श्रद्धेपासून दुरावलेपण व जीवनाची अशाश्वतता हे त्यांनी फकीर व चिमणी–सापाची प्रतीके वापरून दाखविले आहे.

दुसरे म्हणजे भालचन्द्र नेमाडे ह्यांचा "हल्ली लेखकाचा लेखकराव होतो का?" हा लेख. चांगला लेखक व चांगला वाचक हळूहळू नाहीसा होत चालला आहे, त्याचे वन्यपशु प्रमाणे रक्षण करावयास पाहिजे असे त्यांनी प्रतिपादिले आहे.

आजकालचे साहित्यिक व साहित्यसंस्थांचे त्यांनी केलेले चिंतन फार परखड आहे. अंतर्मुख व्हावयास लावणारे आहे. आजच्या प्रचार–संस्था, प्रकाशन–संस्था, अड्डेवाजांच्या हातात असून, लेखकाने लेखन हा धंदा करून उथळ, हिणकस, अप्रामाणिक साहित्याचे पीक काढणे सुरू केले आहे. ह्या अड्डेवाजीने जोमदार, तेजस्वी लेखक सुद्धा माडोत्री होण्याची भीति नेमाड्यांना वाटते.

लेखनकलेचा समाजात प्रतिष्ठा मिळविण्याचे साधन म्हणून वापर सुरू झाला आहे. लेखक व तथाकथित टीकाकार त्यांनी परस्परांचा उदोउदो करून सरकारी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कमिटयांवर जाऊन वसावे, पुस्तकांच्या निव्वळ संख्येच्या शिडीने संमेलनाध्यक्षपदावर पोचावे, आर्थिक उन्नति साधावी, अशी परिस्थिती दिसते. चार परदेशी पुस्तके वाचून पंडिताच्या आवाजाने मराठी साहित्यात धुडगूस घालणारे टीकाकार, कवि आज अमाप आहेत. त्या भांडवलावर कंकांचे ढोंग बाहेर काढू पाहणारे साहित्यिक आपल्या अड्ड्यातील, चक्रीतील मोंगळ, तकलादू सोवत्यावद्दल मात्र अक्षर बोलावयास तयार नसतात.

परिस्थितीच्या प्रतिकूलतेने आलेल्या अनुभवाचे भांडवल करून प्रतिष्ठा पावलेल्या व नंतर आर्थिक दृष्ट्या वर आलेल्या लेखकाने दुःखगर्भ साहित्य पाडीत बसावे व त्यावर पुन्हा प्रतिष्ठा व अर्थप्राप्ती करून घेऊन सुखाने जगावे ही आजची रीत. हे अधःपतन थांबावयास पाहिजे, दुःखाला सामोरे जाण्याची तयारी असावयास पाहिजे. निव्वळ मानमरातवासाठी, नावलौकिकासाठी भांडवल म्हणून, पैसा मिळविण्याचे साधन म्हणून लेखन करणारानी आज मराठी साहित्य क्षेत्र वजवजले आहे.

अस्सल लिहिण्याच्या अवस्थेतला लेखक व वाचण्याच्या अवस्थेतला अस्सल वाचक अजून कसेबसे जिवंत आहेत. अशा लेखकाचे तेज एखाद्या पुस्तकात जाणवेल तेवढेच; एरव्ही तो नाहीसा होत चालला आहे. त्याचे रक्षण करावयास पाहिजे आहे. Preserve Wild Like सारखीच ही घोषणा.

विदारक सत्यावर नेमाडेंनी पाडलेला हा उजेड. त्याच्या आधारावर पुन्हा स्वतःवरून एकवार नजर-फिरविण्याची लेखक-संपादक-प्रकाशकांना वुद्धी झाली तरी तेहि नसे थोडके.

— जयंत देवधर

* * * * *

पश्चिमेची क्षणचित्रे

प्रवास वर्णन हा असा साहित्य प्रकार आहे की ह्यांत लेखकाला स्वतःचे व्यक्तिमत्व प्रत्यक्षतः उलगडून दाखवण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य असते. सुदैवाने मराठी-मध्येहि प्रवास-वर्णन म्हणजे केवळ संबंधित स्थाना-संबंधी माहिती देणे ही जुनी समजूत नाहीशी होत आहे व प्रवासवर्णन म्हणजे इतर साहित्य प्रकारांसारखीच सृजनात्मक साहित्यकृति होऊ शकते हे ओळखले जाऊ लागले आहे.

श्री. द्वा. भ. कर्णिक हे 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक आणि राजकारणी कार्यकर्ते व विचारवंत म्हणून प्रसिद्ध आहेत. १९६३ साली त्यांनी ब्रिटन व जर्मनी ह्या दोन देशांना भेटी दिल्या, त्यासंबंधी त्यांच्या लेखांचा संग्रह 'पश्चिमेची क्षणचित्रे' ह्या पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला आहे.

ते ब्रिटनमध्ये असतांनाच तिथे भारताच्या राष्ट्रपतींचे स्वागत झाले त्याचे फार सुंदर वर्णन लेखकाने आपल्या पहिल्याच लेखांत केले आहे. तसेच प्रोफ्यूमो प्रकरणी त्याच वेळी ब्रिटनमध्ये गाजलेल्या वादळाचीहि माहिती दिली आहे. चक्षुर्वै सत्यम् अशी ! स्कॉटलंडचे आकर्षक, निरोगी व संपन्न जीवन पाहून कर्णिक कळकळीने उद्गारतात, "भोजन हा एक यज्ञ, जीवन ही एक विकृति, आणि जीवन्मुक्ति हे उद्दिष्ट ही अंतर्मनाची खूणगाठ बांधलेल्या आपल्या लोकांना समृद्धीचा मार्ग तरी कसा धरता येईल ?"

'ब्रिटनच्या स्वातंत्र्यप्रिय व सहिष्णु स्वभावाचे मूर्तिमंत स्मारक' म्हणून हाइड पार्कचे त्यांनी केलेले वर्णन उत्कृष्ट आहे. आपल्याकडे उद्योगधंदे राष्ट्रीय मालकीचे करण्यासंबंधी विचार चालू आहे. परंतु त्यासंबंधांत कर्णिक सांगतात, "खाजगी मालकीच्या धंद्याइतकी सुद्धा सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांनी प्रगती केली नाही आणि अनेक वेळा सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांत वशिलेबाजी व अकार्यक्षमता वाढलेलीच दिसून येते. या अनुभवामुळे उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करण्यावद्दल मजूर पक्षात किंवा सर्व-साधारण कामगारांतहि फारशी आस्था राहिलेली नाही." तसेच पुढे ते आणखी महत्वाची गोष्ट अशी सांगतात की—"कल्याणकारी राजवटीचा ब्रिटनमध्ये खंबीर पाया रोवला गेल्यानंतर वस्तुतः मजूर पक्षाला अधिक पुरोगामी होता येत नाही किंवा हुजूर पक्षालाहि अधिक प्रतिगामी बनता येत नाही. त्यामुळे कोणताहि पक्ष अधिकारारूढ झाला तरी ब्रिटिश समाजव्यवस्थेत व राजकीय मतप्रणालीत फारसा फरक घडून येण्याची शक्यता दिसत नाही."

जर्मनीत असतांना दोन जर्मनीत बर्लिन शहर दुभंगणारे विद्युत्वाहक तारांचे काटेरी कुंपण पाहूनहि त्यांच्या मनाला अपेक्षित खेद झालेला आहे. पूर्व बर्लिन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मधील असुरक्षित म्हणून ओसाड, निरस जीवनाचीहि ते माहिती देतात.

जर्मन लोकांच्या वैशिष्टयावर नेमके बोट ठेवताना ते म्हणतात की "हे लोक शुष्क तत्वचर्चेत रस घेणारे नाहीत किंवा ध्येयवादाच्या कल्पनामालात रमून जाणारेहि ते लोक नाहीत. ते खरेखुरे वास्तववादी आणि व्यवहारी लोक आहेत की जे आपल्या चलनाची किंमत वाढवणे, आपल्या उत्पादनाचा दर्जा उंच करणे आणि स्पर्धेच्या बाजारांत मान ताठ ठेवणे हे आपल्या तात्विक भूमिकेपेक्षा अधिक मोलाचे मानतात." तसेच "आपल्याकडे समाजवादाची पोपटपंची चालू असते व राष्ट्रीयीकरणाचे तुणतुणे जे वेळोवेळी वाजवले जाते तसली अर्थशून्य ओरड जर्मन समाजवादी पथ करीत नाही. त्याला नुसते तात्विक समाधान प्राप्त करून घ्यावयाचे नाही तर जर्मन राष्ट्राची भक्कम पायावर उभारणी करावयाची आहे व लोकांच्या वाढत्या जीवनमानांतूनच समाजवादाचे यश संपादन करावयाचे आहे."

या तऱ्हेचे मार्मिक विचार त्यांच्या लेखांमध्ये ठिकठिकाणी आढळतात. परंतु या प्रवासवर्णनाला ललित बाजू नाही. ब्रिटनमधील व जर्मनीमधील सामाजिक व राजकीय स्थितीसंबंधी ते बरंच काही लिहून जातात. (तेहि गंभीर, चर्चात्मक सुरात !) पण ह्या देशात त्यांना स्वत:ला निखळ माणूस म्हणून इतर काही फारसे जाणवलेले दिसत नाही ! प्रभाकर पाध्ये, दिलीप चित्रे, पु. ल. देशपांडे, गंगाधर गाडगीळ वगैरेंच्या वर्णनात त्या त्या प्रत्येकाच्या व्यक्तिमत्वाचे विशेष रंग मिसळून ती प्रवासवर्णने ललित, सृजनात्मक स्वरूपाची झालेली आहेत. उलट डा. भ. कर्णिकांचे प्रवासवर्णन मात्र गद्य, शुष्क व लेखवजाच वाटते.

— शशिकांत नारायण केळकर

वा. म. जोशी .... (पान ४९ वरुन)

शिवाय राहणार नाहीत." श्री. ग. त्र्यं. माडखोलकरही त्यांच्याबद्दल अशीच भावना बाळगतात. त्यांना वाटते की, "वामन मल्हार जोशी म्हणजे तत्त्व जिज्ञासेच्या गुहेत चिंतन करणारे मुनीच."

प्रा. वा. ल. कुळकर्णी तर वा. मं. ना ग्रंथकारांचे ग्रंथकार म्हणून गौरवतांना असे अंदाज बांधतात की, "प्रा. फडक्यांच्या पहिल्या कादंबऱ्या....खांडेकरांची ध्येयप्रियता, माडखोलकरांची तत्वचर्चेची आवड व पु. य. देशपांड्यांची विचारवशता यांची स्फूर्तिस्थाने वामनरावांच्या कादंबऱ्यात नसतील असे नाही...." ते पुढे म्हणतात की "तंत्राचा नसला तरी ललित कलेच्या मंत्राचा आदर्श त्यांनी आमच्या लेखकांसाठी निर्मिलेला आहे."

वामनरावांनी आजच्या लेखकांना दिलेला हा 'मंत्र' कोणता ? तर ते म्हणत—"वाङमय हे नुसत्या विद्वत्तेने निर्माण होणार नाही....चांगले जीवन जगल्याखेरीज चांगले वाङमय निर्माण होणार नाही. असे वाङमय कदाचित सदोष असेल. पण ते लोकांना अधिक आवडेल.' आणि वामनरावांचे स्वत:चे वाङमय खरोखर कलादृष्टया काहीसे सदोष असूनही कलावादी प्रा. फडक्यापासून तो वास्तववादी मर्ढेकरांपर्यंत सर्वांनी त्यांची गौरवपूर्ण दखल घेतल्याचेच दिसून येते.... त्यांच्या वाङमयातही त्यांच्या जीवनातील सत्य, सौजन्य व सौंदर्य प्रतिबिंबित झाले होते.

सत्य, सौजन्य व सौंदर्य यांच्या समन्वयासाठी त्यांनी केलेला प्रयत्न आणि कला व जीवन या दोहोंनाही त्यांनी दिलेला सारखाच मान या दोन गोष्टीमुळेच त्यांना साहित्यातील मुनी म्हणजे योग्य होईल. स्वामी विवेकानंदांनी कलावंत आणि ऋषी यांची परिमाषा करतांना ही दोन टोके असल्याचेच दाखविले. ते म्हणतात, "The rishi tries to realize the ideal and the poettrics to idealize the real." वास्तव व आदर्शाची ही दोन टोके एकत्र आणण्याचा, निदान या प्रेय आणि श्रेयातील अंतर कमी करण्याचा, वामन मल्हार जोश्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला. म्हणूनच त्यांना "साहित्यातील ऋषी" म्हणणे अगदी रास्त आहे. नव्हे यापेक्षा अधिक योग्य शब्दात वा. म. जोश्यांचे वर्णन करता येणार नाही. असा हा ऋषी जगातून गेल्यावर साहजिकच सर्वांना दु:ख झाले. श्री. प्रभाकर पाध्ये यांच्याप्रमाणे सर्वांनाच तीव्रतेने जाणवले की, "वामनरावांनी जगाचा निरोप घेतला नि मराठी सारस्वतातील पावित्र्य पोरके झाले...."

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क व च

म. ल. वराडपांडे

(स्वर्ग आणि बस यांच्या प्रवेशद्वारावर बस-कंडक्टर उभा असतो)

– तत्वज्ञ 'मी'

बस सुरू होते. (बसेस डिझेलवर चालत नाहीत, कंडक्टरच्या घंटीवर चालतात– एक चिंतन)

'योग्यालाही थक्क करील इतक्या अलिप्त वृत्तीनं जगण्याची कला' हे शहरस्थाचं खास वैशिष्टय. गडवड, घाई, गोंधळ, यात तो स्थितप्रज्ञासारखा वावरत असतो. (सकाळी घातलेली परीटघडीची पॅन्ट सर्वत्र वावरूनही एक घडीही न विघडता तो घरी आणू शकतो.) 'आम्हाला नाही इतरांच्या भानगडीत नाक खुपसायला आवडत' हे त्याचे लाडके तत्त्वज्ञान. (अर्थात नाकाला जराही ओरखडा पडणार नाही इतक्या बेतानं कुठही नाक खुपसायची त्याची तयारी असते हा भाग वेगळा. पण नाक जरादेखील अडचणीत सापडणार असा वास त्याला येताच तो पसार होतो. पसार होण्याच्या कौशल्यातही तो अद्वितीयच !).

एकदा बसमध्ये प्रवेश मिळवला की अलिप्त आत्मसमाधानाचं कवच पांघरून स्वारी (की सवारी?!!) जी आत्मलीन होते ती इच्छित बसस्टॉप आल्यावरच (किंवा बस उलटल्यावर) जागृत होते. (किंवा ॲक्सिडंटच्या भानगडीतून सुटण्यासाठी कायमचे डोळे मिटते. पोलिसांपेक्षा यमदूत बरे ! काही भानगड नाही. शिवाय त्यांनी पैसे वगैरे खाल्ल्याचेही ऐकिवात नाही.)

लहान मुलांना घेऊन, आपला क्षणोक्षणी जाणारा तोल सांभाळत एखादी लेकुरवाळी बसमध्ये दांड्याला कशीवशी लोंवकळत संत्रस्त अवस्थेत उभी आहे अशा क्षुल्लक गोष्टी लक्षात येण्यापलीकडे त्यांची समाधीअवस्था गेलेली असते. आई होण्याचे प्रायश्चित बाईने भोगलेच पाहिजे. सांख्यांच्या 'पुरुषा'सारखा हा आपला जलातील कमलपत्राप्रमाणे वगैरे .)

आणि अचानक ड्रायव्हरसाहेबांना संचलनकौशल्याचं प्रदर्शन करण्याची लहर येते. मग ब्रेक आणि वेग यांच्या वादीसंवादी लयीतून निर्माण होणारे छोटे मोठे भूकंप. नेमका वळणावर येणारा कलता वेग (उडत्या तबकड्यातून प्रवास करण्याचा अनुभव देत असल्याबद्दल बस कंपनी भाडेवाढ करणार'– एक हेडलाईन) त्यात लेकुरवाळीची होत असलेली त्रेधा!! (संततीनियमनाचा प्रचार करण्याचा नेमका क्षण . . . बसमधून सुखानं प्रवास करण्यासाठी संततीनियमन करा . . 'हे चित्र पहा आणि ते चित्र पहा . .' एक चित्रासारखी बाई एकटीच आरामात उभी आहे . . . चेहऱ्यावर इस्मित वगैरे . . आणि दुसरी लेंढारासह . . चेहऱ्यावर ॲनॅसीन खाण्यापूर्वीचा भाव . .) बसमध्ये लावण्यासाठी एक कल्पक पोस्टर. (कल्पना–अस्मादिकांची . . फॅमिली प्लॅनिंग खात्याला कॉपीराइटविना सप्रेम भेट . .) अडाणी बायका बिचाऱ्या या बाबतीत सुखी. त्या आपल्या सरळ खाली बैठक मारतात. (त्याही स्थितप्रज्ञच!!)

एखादा वयोवृद्ध बसमध्ये चढत असतानाच नेमकी घंटा वाजविण्याची अभिनव कल्पना कंडक्टर नावाच्या कल्पक प्राण्याला सुचते. (स्वर्ग आणि बस यांच्या प्रवेशद्वारावर कंडक्टर उभा असतो– एक तत्त्वज्ञ)· त्या धक्क्यातून सावरून तो यदाकदाचित् आत आलाच,

(पान ६७ वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वरात

–२–

ताराचंद्र खांडेकर

प्रणय आणि यौवन. नव्या उन्मेषांच्या गूढ रेशमी तंतूंची अधिकच गूढ सवेदना. मरणालाही जीवन देणारी, तरीही अनाकलनीय. मोहाची मगरमिठी आणखीच घट्ट करणारी, जगविणारी, गिळणारी आणि नवजीवन देणारी.

... शहनाईची आर्त तान मात्र त्या क्षणी अंतर कापत होती. शून्याची ती पुढे सरणारी क्षणवर्तुळाची घटका. निशेच्या नीरव मोहमयतेत नग्न चंद्रकिरणांची बोचरी स्पंदनं.. तिच्या आठवणीनं अंतर्मुख होऊन मी सहज बाहेर पडतो. माझी पाऊलवाट मळलेली होती. तरीही मला 'त्या' अशाश्वततेची यत्किंचितही कल्पना नव्हती.

हो, अन् त्याचं कारणही तस उत्कट होतं. माझं मलाच ठाऊक. तिच्या शब्दांवर माझा पुरता विश्वास होता. ती मला शेवटची भेटली ती रात्र अशीच मधुर चंद्राची होती. पुष्पवतीचे गात्र न् गात्र कौमुदी बिंबाच्या बोचऱ्या संवेदनासाठी आसुसले होते. पाकळयांनी आमच्या अभेद्य जवळिकेवर यथेच्छ वर्षाव केला होता. तिच्या गळयाभोवती माझ्या हाताचा विळखा तिनं चंद्रहार म्हणून वेष्टिला होता. नि डोळयातील अतृप्ती ती पीत होती. तिच्या गुलाबी ओठावर माझ्या ओठांनी स्पर्श केला अन् ती स्पंदनहीन झाली. प्रवाहिनीच्या मोहमयी जलधारांसारखी ती अधिकच गतिगता झाली. तिच्या त्या लाघवी अवस्थेची ती प्रचीति मला त्या क्षणी नव्यानंच जाणवली अन् मग माझ्या पुरुषेपणाची तीच प्रणत परिणतीही झाली.

.... धूसर कातरवेळीं वाहाणाऱ्या पहाटवाऱ्यानं तिचं अंग कंपित व्हायला आलं होतं. दर्पणात स्वतःचं चुंबन घ्यायची ती वेडी अवस्था तिला ग्रासून होती. तिच्या ओठावर आता अवेळीच हुरहूर येत होती आणि बोटांची चाळवाचाळव उगाच पदराशी लडिवाळत होती. तिच्या काजळलेल्या भिवया आता कडेवर जळडोहाचे वेध घेत होत्या आणि तिचे शरीरस्थ मातीचे अवयव तिच्या आवडत्या मनभावन अर्धांगासाठी हपापले होते. ती आता अकालीच वेसावधतेतून सावरण्याचा अट्टाहास करीत होती आणि तरीही तिचा तोल आसरा शोधत होता. ती वेडीपिशी झाली होती, सावधपणेच ..

.... आम्ही तिच्या श्रद्धाळू इष्ट देवतांपुढे उभे होतो. ती मौनमुग्धा झाली होती. माझ्या अंतःप्रेरणेला मात्र शून्याची प्रचीति होती. इथे विकसनाची गति उर्ध्वगामी होऊन परिवर्तित व्हायची होती. ती खाली वाकली तेव्हा मी स्वत्व हरपलो आणि तिला वट्ट कवटाळलं. तिच्या पापण्यांना पाझर फुटला अन् मग त्याच साक्षीनं मी तिच्या शब्दांना गुरफटलं. ती शुभमंगल घटका होती.

.... शहनाईची आर्त लकेर आता म्हणूनच ओळखीची वाटते. तीही ओळखीचीच आहे, केवळ ओळखीची. आमचा सहवास युगातीत आहे ना, म्हणून ! तिचे अस्फुट शब्द माझ्या सारसर्वस्वाचं तांडव करणारे नर्तनगीत आहेत आणि तिच्या कपाळावरील तो भर मध्यरात्रीही दुरून ही चकाकणारा गोलाकार सौभाग्य कुंकुमतिलक.... तो माझ्या सारसर्वस्वाची चिता तेवविणारा समिधांचा होमकुंड आहे.

ही रात्र तिच्या मधुचंद्राची आहे. तिचं प्रमत्त उदयमान यौवनपुष्प पूर्णांशानं विकसलेलं आहे. तिच्या हृदयावर लौकिकानं धरलेल्या पतिदेवाचा हृदयभार आहे. तिच्या ओठावर हुरहूर आहे. बोटांची चाळवाचाळव तशीच आहे. मंदमधुर वातावरणानं भारलेल्या मिलनसायी ती तीच आहे. माझी हुरहूर मात्र माझीच आहे. पण तिच्या हृदयाच्या डाव्या कोपऱ्यावरील ती चंद्राकृति माझ्या परिचयाची आहे, माझ्याच..... .

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. तात्यासाहेब कोल्हटकर व मासिक मनोरंजनाचे लेखक यांचे छायाचित्र

मागील ग्रुप फोटोची मूळ कल्पना श्री. राम गणेश गडकरी यांची १९१४ किंवा १५ साली नाताळात मासिक मनोरंजनाचे लेखक मुंबईस एकत्र आले असता त्यांचे एक छायाचित्र काढवून घ्यावे असे श्री. गडकऱ्यांच्या मनात आले. त्यांची ही कल्पना 'मनोरंजन'चे संपादक श्री. काशीनाथ रघुनाथ मित्र व श्री. विठ्ठल सीताराम गुर्जर यांनाही पसंत पडली. त्यावेळचे ज्येष्ठ नाटककार, टीकाकार व विनोदी लेखक, त्याचप्रमाणे श्री गडकरी, गुर्जर प्रभृतींच्या गुरुस्थानी असलेले श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांना केंद्रस्थान देऊन इतर साहित्यिक त्यांच्या सभोवार असावे अशी गडकऱ्यांची या छायाचित्राबद्दल कल्पना होती. दि. १३ मे १९६४ रोजी प्रा. म. श्री. पंडित यांना लिहिलेल्या एका पत्रात, या छायाचित्रात असलेले एक कवि श्री. नागेश म्हणतात :

"मला वाटते १९१४ किंवा १५ साली आम्ही काही मनोरंजनाचे लेखक व कवि नाताळात मुंबईस एकत्र आलो. त्यांची नावेच सांगतो. गुर्जर, गडकरी, ठोमरे, काणेकर, परूळकर, ठेंगे, कोल्हटकर, रेंदाळकर हे ते गृहस्थ होत. गडकऱ्यांच्या प्रेरणेने आमचा एक ग्रुप फोटो कै. मित्रांनी तारापोरवाल्यांकडून त्यावेळी काढून घेतला होता. तो पुढे मनोरंजनात प्रसिद्ध झाला."

'महाराष्ट्र साहित्य' मार्च-एप्रिल १९२४ च्या अंकात या ग्रुपमधील एक श्री. पु. गो. काणेकर (शारदाश्रमवासी) यांचा बालकवींची समग्र कविता हा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यात श्री. काणेकर म्हणतात.

'साल बरोबर आठवत नाही. डिसेंबरचा शेवटचा आठवडा असावा. श्रीयुत तात्यासाहेब कोल्हटकर, क. गडकरी, श्रीयुत नवरे (कवि नागेश) हे त्यावेळी मुंबईत आले होते आणि वरचेवर मुंबईस न येणारे ठोंबरे हेही आले होते. ही संधी साधून 'मनोरंजना'च्या लेखक व कवि मंडळीचा एकत्र फोटो काढून घ्यावा असे कै. गडकऱ्यांनी कै. काशीनाथपंत मित्र यांना सुचविले. मित्रांना ती सूचना तात्काळ पसंत पडली व ती अमलात आणण्याचे त्यांनी ठरविले. कै. रेंदाळकर व श्री विठ्ठल सीताराम गुर्जर हे 'मनोरंजना'च्या संपादक वर्गात त्यावेळी होते. श्रीयुत गोविंद मल्लीनाथ ठेंगे व श्री. लक्ष्मण विनायक परुळकर हे मुंबईचेच रहिवासी, या सर्व मंडळीबरोबर प्रस्तुत लेखकालाही फोटो काढून घेण्यासाठी जाण्याचे निमंत्रण देण्यात आले होते." (पृ. ४००/४०१).

या ग्रुप फोटोत 'मनोरंजनाची एक लेखिका, श्रीपाद कृष्णांची अग्रशिष्या व 'दामिनी' नाटकाची लेखिका श्रीमती हिराबाई पेडणेकर यांचाही समावेश व्हावा अशी श्री. गडकरी व श्री गुर्जर यांची इच्छा होती. पण श्री. मित्र, ठेंगे व परुळकर यांनी या कल्पनेला विरोध केला. श्रीपाद कृष्ण तटस्थ राहिले. त्यांच्यात व हिराबाईत पुढे जे वितुष्ट आले त्याला हेही एक कारण झाले. शेवटी हिराबाईंशिवायच हे छायाचित्र घेण्यात आले.

श्री. गडकरी यांच्या मृत्यूनंतर 'उद्यान' मासिकाचा जो खास अंक निघाला, त्यात या छायाचित्राचा ब्लॉक प्रथम छापण्यात आला. नंतर तो मासिक 'मनोरंजन. च्या 'मित्र' अंकात, जुलै १९२० साली प्रकाशित झाला. आचार्य अत्रे यांनी कै. गडकऱ्यांच्या मृत्यूला २५ वर्षे झाल्यानंतर 'समीक्षक' मासिकाचा विशेषांक फेब्रुवारी १९४४ साली काढला, त्यात त्यांनी ह्या छायाचित्राचा ब्लॉक 'गुरु, शिष्य आणि मित्र' या शीर्षकाखाली प्रसिद्ध केला. श्री. अत्रे यांनी हे छायाचित्र कै. गडकऱ्यांचे धाकटे बंधू श्री. शंकर गणेश गडकरी यांच्याकडून मिळविले होते. हा ब्लॉक सर्वोत्तम आहे.

या छायाचित्राची एक प्रत मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात होती. त्यावरून श्री. वा. वि. भट यांच्याकरवी प्रतिलिपी तयार करवून सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी ती समारंभपूर्वक वि. सा. संघाला भेट दिली. या छायाचित्राची दुसरी प्रत वि. सा. संघाच्या खामगाव शाखेची कोल्हटकर स्मारकाची इमारत पूर्ण झाल्यावर कोल्हटकर जन्मशताब्दीचे निमित्त तेथे लावण्यासाठी देण्याचे श्री. माडखोलकर यांनी ठरविले आहे.

—म. ल. वराडपांडे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कविता—

डोळे

असंख्य भकास रस्ते तुडवून
आकांक्षांचे ताबूत करीत आहेत
प्रस्थान शून्यात .. .. ..
ज्याच्या रंगवेरंगी चकाकणाऱ्या
कागदांनी निर्मिले होते
स्वप्नांचे रंगित विश्व भूतकाळात
अनेक आतुर डोळे झाले होते
बंदिस्त एका आगळ्या आकर्षणात
पण आज तेच डोळे
तांबडे होऊन बघताहेत
माझ्याकडे तिऱ्हाइतपणे
जणू काही मी आज
त्यांचा कुणीच नाही.

उमलण्यापूर्वी

उमलण्यापूर्वीच गळून पडावीत फुले
तशी गळून पडताहेत माझी स्वप्ने .. ..
.. .. दूरवर पसरत जातात
दिशादिशातून असंख्य उदास सूर
माझ्या आर्त प्राणांचे
कुणी तरी शिंपडत असतं तेजाब
माझ्या छिन्नविच्छिन्न जखमांवर .. ..
उफाळणाऱ्या आगीत
मरणकाळचे चित्कार
त्यातच कुत्र्यांचे भेसूर ओरडणे
मध्यरात्रीचे .. .. ..
सारे स्मशानच उभे असते भोवताल
.. .. .. सारे आहे माझ्याजवळ
पण असून नसल्यासारखे
आता ठोके बंद पडायला हवेत
फार झाले सहन करण्यापलिकडचे.

— कुसुमानंद

उद्या

उद्या येणार आहे वाघणी भरभरून
आंत्रेमोहोर तांदुळ
ट्रका भरभरून रवा
बैलगाड्या भरभरुन पापड लोणची मसाले
विमानातून (हवाबंद) जागतिक शांतता.
या सनातन देशापुरतं बोलायचं झाल्यास—
उद्या पिलंभट आमंत्रणार आहे
हिरालाल मेहेतराला त्याच्या मेहेतराणीसह
(सवाष्ण) भंगी म्हणून.
(इथे हसेल तो 'श्रीहरी' खुद्कन.)
उद्या हाफिजली उडवतील रंग रंगपंचमीचा
रंगराव उर्फ दाजीसाहेब पोतदारांच्या अंगावर.
उद्या काम करू इच्छिणाराला मिळेल मनपसंत
काम — सशुल्क.
असणार नाही कुणी कामपीडित
लूपबंद कामिनींचे थवे असतील
(राज) रस्त्यारस्त्यावर.
उद्या ढाळणार आहे इतिहास अश्रु
पश्चातापाचे
स्वतःच्याच इतिहासावर.
फक्त आजच देऊन ठेवा तेवढी किंमत
स्वातंत्र्याची रक्ताची माणुसकी आदिंची.
कारण न उगवणारा उद्या तोही उद्या
उगवणार आहे
आज नकद आणि उद्या सर्व उधार आहे
(फक्त आज संध्याकाळपर्यंत तेवढी ही
जगबुडी थांबऊन ठेवायची आहे.)

— वामन इंगळे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाहीतर

तो आला असेल
रक्तफुलांच्या पंखफडफडीवर
डहुळलेले आकाश तोलीत–
नाहीतर
गंधरेशमी वस्त्र ल्यालेल्या माझा श्वास
त्याच्या तीक्ष्ण चुंबनचोचीमधल्या
बकुलफुलांच्या मालेनं
कोंदला नसता
असा !

अभेद

मी माझ्यातच जर उरतो
तुमच्या प्रतिमेस कशाला
प्रभु, क्षणसुमनांच्या माला ?

मी माझ्यातच जर नुरतो
तुमची प्रतिमाच कशाला ?
प्रभू, पूजन अभेद उरला.

– रमेश ललगूणकर

डॉ. कोलते....(पान ४७ वरून)

समीक्षेचे प्रमुख प्रवर्तक होत असे म्हणावे लागते. चिपळूणकरांपासून वा. ल. कुलकर्णी यांच्मापर्यंत आज वाङ्मयसमीक्षेने गुणदोषविवेचनात्मक, साहित्यशास्त्रीय, तंत्रविषयक, निर्णायक, आस्वादक व सर्जनशील अशा वेगवेगळ्या वाटांनी बराच दूरचा पल्ला गाठला आहे. आता तर तिला एक आकारही येऊ पाहात आहे. समीक्षेच्या मार्गक्रमणात मराठीचे एक वाङ्मयसमीक्षक म्हणून डॉ. कोलते यांचे एक निश्चित स्थान आहे, हे या लेखसंग्रहावरून सिद्ध होते.

डॉ. कोलते यांची समीक्षा प्रामुख्याने गुणदोषविवेचनात्मक व आस्वादक प्रवृत्तीची आहे. दोषदिग्दर्शन करतानाच श्रेष्ठ वाङ्मयकाराचे हार्द हळुवारपणे उकलून दाखविणारी त्यांची पद्धती सहृदयानंददायी आहे. त्यांचा व्यासंग वेचक असून श्रुतयोजन करणारी उपस्थिती पक्की आहे. त्यांच्या चोखंदळ आणि चौकस वृत्तीला त्यांनी आजवर डोळसपणे केलेले अवलोकन व पर्यटन हे प्रामुख्याने कारणीभूत आहेत. म्हणूनच वाङ्मयसमीक्षेच्या एका विशिष्ट परंपरेत किंवा पठडीत ते मोडत नसून विकासशील अशा समीक्षावाङ्मयाचे सातत्य टिकवून ठेवणारा एक टप्पा म्हणून त्यांचे समीक्षात्मक लेखन मराठी समीक्षावाङ्मयाच्या इतिहासात नमूद करून ठेवावे लागेल.

व्यवसायात्मक व संशोधनात्मक कार्याचा मोठा व्याप दक्षतेने सांभाळून डॉ. कोलत्यांच्या केवळ छंद म्हणून केलेल्या समीक्षाविषयक लेखांना जी एक वाङ्मयीन प्रतिष्ठा लाभली आहे तिचे यथामति दिग्दर्शन येथवर केले. त्या क्षेत्रातील कोलत्यांचे कर्तृत्व लक्षणीय असून त्यांच्या 'साहित्यसंचारा' मुळे मराठीतील समीक्षात्मक वाङ्मयात एक महत्त्वाची भर पडली आहे, असे निश्चयपूर्वक म्हणता येते. या संग्रहातील लेख हे निरनिराळ्या काळी, वेगवेगळ्या निमित्तांनी व भिन्न भिन्न नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांचा हा एकत्र केलेला हार लेखकाच्या आवडीनिवडींच्या धाग्याने अनुस्यूत झालेला पाहताना वाचकांना एक वेगळाच आनंद वाटतो.

प्रतिभाशाली कवी, कादंबरीकार आणि विशेषेकरून नाटककार यांच्या श्रेष्ठ कलाकृतींच्या रसोद्ग्राही समीक्षेत रमलेले डॉ. कोलते आपल्या या 'साहित्यसंचारा'त ठिकठिकाणी स्वतःच्या व्यक्तिवैशिष्ट्यांनी नटलेले दिसतात. त्यांनी ज्यांच्या कृतींचे समीक्षण केले त्यांच्यापेक्षा खुद्द लेखकाचेच वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व येथे ठळक रंगरेषांनी चालतेबोलते झाले आहे, हेच या टीकालेखसंग्रहाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी रंगभूमि प्रदर्शन

सुधाकर लोखंडे

मराठी रंगभूमीचा उगम, विकास आणि उत्कर्ष दर्शविणाऱ्या शेकडो दुर्मिळ छायाचित्रांचे, नाट्यविषयक जुन्या ग्रंथांचे आणि नेपथ्य विषयक जुन्या वस्तूंचे गेल्या अनेक वर्षांपासून संशोधन करीत असणाऱ्या एक उपासकाच्या अपूर्व अशा संशोधन–संग्रहातील काही निवडक अमोल चिजा विदर्भातील नाट्य रसिकांना प्रत्यक्ष पाहण्याची सुवर्णसंधि गेल्या महिन्यात लाभली.

प्रस्तुत 'मराठी रंगभूमि प्रदर्शन' स्थानिक विदर्भ साहित्य संघाच्या नाट्यसमितीने वि. सा. संघाच्या शिवाजी ग्रंथालयात दि. १६ मे ते १ जून पर्यंत आयोजित केले होते.

रंगभूमिच्या या साधकाचे नाव आहे श्री. के. टी. देशमुख. श्री. देशमुखांनी अतीव परिश्रमपूर्वक आणि तळमळीने उपलब्ध केलेला हा 'नाट्य चित्र-ग्रंथ–वस्तू संशोधन संग्रह' म्हणजे मराठी रंगभूमीचा साद्यंत जिवंत असा इतिहासच मानावा लागेल. ग्वाल्हेरपासून तंजावरपर्यंत ठिकठिकाणी अनेक वर्षे सातत्याने फिरून श्री. देशमुखांनी विलक्षण चिकाटीने असंख्य जुनी छायाचित्रे हुडकून काढली, इतकेच नव्हे तर जुन्या अस्पष्ट आणि जीर्ण झालेल्या छायाचित्राच्या नकला तयार करून ती छायाचित्रे नव्या मनोहर स्वरूपात सादर करण्यात त्यांनी कमालीचे यश संपादन केले आहे.

प्रस्तुत प्रदर्शनाद्वारे श्री देशमुखांनी काळाच्या पडद्याआड लुप्त झालेला मराठी रंगभूमीचा वैभवशाली सोनेरी कालखंड रसिकांसमोर आणि रंगभूमीचा वैभवशाली सोनेरी कालखंड रसिकांसमोर आणि रंगभूमीच्या अभ्यासकांसमोर आता साक्षात उभा केला आहे.

रंगभूमीशी निगडीत अशा विविध अंगोपांगाचा चिकाटीने अभ्यास करून श्री. देशमुखांनी आपल्या संशोधनकार्याची बैठक व्यापक केली आहे. त्यांच्या संशोधनसंग्रहामध्ये नाट्यशास्त्रावरील जुने ग्रंथ, नट आणि नाटककारांची चरित्रे, आत्मचरित्रे, रंगभूमीच्या इतिहासाचे ग्रंथ आणि नवीजुनी नाटके मिळून सुमारे एक हजारावर पुस्तके आहेत. अगदी जुनी शिळाप्रेसवर छापलेली पोथ्यांसारखी काही नाटकेही आहेत. रंगभूमीवर एकेकाळी क्रांतिकारक आणि विनोदी म्हणून गाजलेले अनेक छापील फार्स हे या प्रदर्शनाचे एक खास वैशिष्ट्य होते.

नाटकाच्या पहिल्या प्रयोगाच्या रात्री नाटकाची 'पद्यावली' तेवढी प्रसिद्ध करायची अशी जुनी परंपरा होती. नाटकाचे छापील पुस्तक प्रयोगात काटछाट झाल्यानंतर पुढे यथावकाश प्रसिद्ध होत असे. त्यामुळेच गाजलेल्या जुन्या नाटकांच्या पद्यावल्या आता पाहताना गंमत वाटते.

नाट्यविषयक मजकूर असलेली जुनी वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, इतकेच नव्हे तर केवळ नाट्यकलेला वाहिलेल्या अशा 'नाट्यकथार्णव', 'नाट्यकथामाला', 'नाट्यकला', 'रंगभूमि' या जुन्या मासिकांचे काही दुर्मिळ अंकही प्रदर्शनात ठेवण्यात आले होते. जाहिरातीच्या विभागात शिळाप्रेसवर छापल्या गेलेल्या भावेकालीन पौराणिक नाटक कंपन्यांच्या जाहिरातीपासून पुढे मराठी रंगभूमीने जो एक वैभवशाली कालखंड गाजविला त्या जाहिरातींचा अभ्यास केला तर एक प्रबंधच तयार होईल.

आद्य नाटककार विष्णुदास भावे यांनी स्वतः आपल्या हाताने घडविलेल्या लाकडी कळसूत्री बाहुल्यांचे अवशेष रंगदेवतेचा प्रसादच मानावा लागेल. गोव्याच्या दौऱ्यात श्री. देशमुखांना उपलब्ध झालेल्या चारशे वर्षांपूर्वीच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लाकडी कळसूत्री बाहुल्या असे सिद्ध करतात की कळसूत्री बाहुल्यांचे उगमस्थान महाराष्ट्र आहे.

सुप्रसिद्ध लेखक श्री. मु. गो. काणेकर आणि नाटककार मामा वरेरकरांनी 'चित्रपुराण' आणि 'चित्रकथा' या आता लुप्त झालेल्या मनोरंजनाच्या कलाप्रकारांची माहिती आपल्या आठवणीत दिलेली आढळून येते. कागदावर रंगविलेल्या 'चित्रपुराणा'ची तीनशे वर्षांपूर्वीची चित्रे आणि चारशे वर्षापूर्वी चामड्यावर कातरून रंगविलेली 'चित्रकथे'ची दुर्मिळ चित्रे श्री. देशमुखांनी खूप शोध करून सादर केली आहेत. गोव्याच्या जुन्या रंगभूमीची छायाचित्रे, वेषभूषेचे जरतारी नमुने, १२५ वर्षापूर्वीपासूनचे पौराणिक नाटकात वापरण्यात आलेले देवादिकांचे मुखवटेही पाहतांना आज गंमत वाटते.

विष्णुदास भाव्यांनी १८४३ मध्ये लिहिलेल्या पहिल्या मराठी नाटकातील संवाद लिखित स्वरूपात नाहीत. परंतु गोव्याच्या दौऱ्यात श्री. देशमुखांनी पौराणिक नाटकांच्या जुन्या हस्तलिखित चोपड्या मिळविल्या. त्यामध्ये म्हापशाच्या रघुनाथशेठ सावंत या नाटककाराने १८४४ साली लिहिलेले पौराणिक दशावतारी नाटक विशेष महत्वाचे आहे, कारण त्यामध्ये संवाद लिखित स्वरूपात आढळून येतात.

रत्नागिरी जिल्ह्यातील कसबे वेळंब येथील नाट्योत्सवाची परंपरा फार प्राचीन आहे. १८६९ सालापासूनच्या काही नाटकांच्या वह्या या प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या होत्या. गोव्याचे पेंटर वासुदेवराव दिवाकर आणि मुंबईचे पेंटर जुन्नरकर यांच्या हातचे रंगभूमीवरील दर्शनी पडदे पाहतांना त्या कलावंतांच्या कलाचातुर्याची साक्ष पटते.

प्रदर्शनात काही प्रसिद्ध नाटककार आणि नामवंत कलावंतांच्या हस्ताक्षराचे नमुने, पत्रव्यवहार, डायऱ्या वापरलेल्या वस्तु, जुन्या नाटकाची हस्तलिखिते, व जुन्या कंपन्यांच्या पत्रव्यवहाराच्या जमाखर्चाच्या कारभाराच्या प्रत्यक्ष नोंदीही आपणास बघावयास मिळतात. विशेष उल्लेखनीय म्हणजे नाटककार राम गणेश गडकरी यांच्या हस्ताक्षरातील शंकरराव मुजुमदारांना लिहिलेले एक पत्र, भाऊराव कोल्हटकर यांचे १९०० सालातील एक पत्र, भास्करबुवा बखले यांच्या हस्ताक्षरातील पत्र, गंधर्व नाटक मंडळीच्या १९१५ सालातील एका महिन्याच्या उत्पन्नाचा तवता, तक्त्यावर बालगंधर्व, गोविंदराव टेंबे आणि गणपतराव बोडस या तिन्ही भागीदारांच्या आणेवारीप्रमाणे मिळालेल्या रकमांबद्दल पोच म्हणून पावतीच्या तिकिटांवर केलेल्या सह्या आहेत.

भाऊराव कोल्हटकर पुरुष भूमिका करू लागल्यानंतर 'मृच्छकटिक' नाटकात चारुदत्ताच्या भूमिकेत १८९९ साली जी लखनवी पद्धतीची टोपी रंगभूमीवर घालीत असत तीही आता प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहात असतांना सश्रद्ध रसिक मराठी रंगदेवतेच्या या अमोल ठेव्यापुढे नतमस्तक होतो. नटवर्य केशवराव भोसले यांनी आपल्या हाताने माधवराव वालावलकरांना एक जरीचा रुमाल प्रेमाने म्हणून दिला होता, तो रुमाल पाहतांना त्याला एक वेळेस केशवराव भोसल्यांसारख्या अद्वितीय कलावंताच्या हाताचा स्पर्श झाला होता हे समजल्यानंतर रसिकांचे अंतःकरण आदराने भरून आले नाही तरच.

मराठी रंगभूमि प्रदर्शनातील छायाचित्र विभागात आपणास भावेकालीन पौराणिक नाटकांच्या कालखंडातील दुर्मिळ छायाचित्रे पहावयास मिळतात. किर्लोस्कर, शाहूनगरवासी, गंधर्व, राजापूरकर नाटक मंडळांच्या जुन्या गाजलेल्या नाट्यप्रयोगांची आणि तत्कालीन इंग्रजी आणि पारशी रंगभूमीचा परिचय करून देणारी छायाचित्रेही या प्रदर्शनात मांडून ठेवलेली होती.

नटसम्राट गणपतराव जोशी या थोर अभिनेत्याचा जन्मशताद्विउत्सव ठिकठिकाणी साजरा होत असताना शाहुनगरवासी नाटक मंडळीचा साद्यंत इतिहास दर्शविणारी ही सारी छायाचित्रे पाहणे अगत्याचे ठरते. नटसम्राट बालगंधर्वांच्या निधनानंतर त्यांनी गाजविलेल्या अमर स्त्रीभूमिकांच्या छायाचित्रांचे दर्शनही या प्रदर्शनात घडले.

अलिकडे श्री. देशमुखांनी पारशी, उर्दु आणि हिंदी रंगभूमीविषयक संशोधनास आरंभ केला आहे राजस्थानच्या आपल्या तीन महिन्यांच्या दौऱ्यात त्यांना हिंदी रंगभूमीच्या ज्या अनेक महत्वाच्या चिजा, ग्रंथ आणि जाहिराती उपलब्ध झाल्या त्यांचाही समावेश या प्रदर्शनात होता. 'भारतीय रंगभूमि' ही आपल्या संशोधनकार्याची व्याप्ति आहे असे श्री. देशमुख मानतात.

श्री. देशमुख आता विदर्भाच्या दौऱ्यावर आले असून जुन्या नाट्यचित्रांच्या, वस्तूंच्या शोधार्थ त्यांना अनेक गावी प्रत्यक्ष जाऊन शोध घ्यायचा आहे. त्यांच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कार्याची व्याप्ति मोठी असल्याने आणि त्यांना मिळत असणारी मदत कार्याच्या मानाने माफक स्वरूपाची ठरत असल्यामुळे विपरीत परिस्थितीतही श्री. देशमुख उत्साहाने आपल्या ध्येयासाठी धडपड करीत असतात, ही अतीव कौतुकाची गोष्ट आहे.

साहित्य, संस्कृति आणि कलाक्षेत्रातील श्री. के. टी. देशमुख यांनी केलेली कामगिरी अजोड आहे, यात मुळीच संदेह नाही. त्यांना आपले कार्य नेटाने पुढे चालविण्याकरिता आवश्यक ते सहकार्य मिळणे या संदर्भात आवश्यक आहे. नागपूरात विदर्भ साहित्य संघाने या प्रदर्शनाचे आयोजन करून रसिकांना ते पाहण्याचा व अभ्यासण्याची संधी मिळवून दिली याबद्दल वि. सा. संघाचेही अभिनंदन करणे आवश्यक आहे.

कवच....(पान ५९ वरुन)

तर तिथं कवचधारी मंडळी थंडपणे 'सीटस्थ' असतात. वृद्धांचा सन्मान करण्याची पद्धत आर्यावर्तात जुन्या काळी होती म्हणतात. [जुने जाऊ या मरणालागुनी .. जाळा अथवा पुरुन टाका .. (प्रसंग येता असला बाका .. कंडक्टरला म्हणाच काका.)

नाजुक अवस्थेतील गर्भवती स्त्रिया .. (थांव उद्याचे माउली, तीर्थ गर्दीचे घेईतो), छोटी छोटी शाळकरी मुलं (आवो वच्चे तुम्हे दिखाए झाकी हिंदुस्थानकी ..) सकंप गात्राचे वयोवृद्ध (कृतांत कटकामलध्वजजरा दिसो लागली— सदैव वसवसे झगडता तनू मागली) अटेन्शन् ! या बाबुलोकांची कवचं इतकी तकलुपी नाहीत. प्रत्यक्ष कर्णाने (डॅडी हा कर्ण कोण होता हो-एक कॉन्वेंट प्रॉडक्ट) त्यांचा हेवा करावा. उभे रहा ! उभे रहा ! अहो लोकशाहीत 'उभे राहणारांचा' मान आहे. बससाठी उभे रहाता रहाता पार्लमेंटसाठी उभे रहाल . . .

अशात एखादी बाला बसमध्ये प्रवेश करते ..

(कवचाआत कुठेतरी चलबिचल सुरू होते.)

देखणी, लोभस, तारुण्याच्या कोवळ्या कांतीनं रसरसणारी

(अरे रे ऽ ती उभी आहे.)

उंच, गोरीमुरकी ..

(हाय, फर्श वसपर उनके पैर छिले जाते है ..)

कुरंगनयना ..

(जनता जालीम आहे .. ती उभी आहे हो ऽ ..)

अंडं फुटावं तसं त्याचं कवच तडकतं आणि माणुसकी वगैरे काय म्हणतात ती वाहू लागते.

'तुम्ही वसा न' तो चटकन उभा होत म्हणतो.

ती बसते. स्मितपूर्वक.

आत्मसमाधानानं तो सर्वांवर नजर फिरवतो .. कर्तव्य केल्याची सुखद जाणीव .. आम्ही दोघंही एकाच स्टॉपवर उतरतो.

'आपल्या नागपुरी लोकांना काही एटिकेट्सच नाहीत. तो रागारागानं मला म्हणतो. 'ती मुलगी मघापासून उभी होती ..'

'मग काय झालं ?' मी आश्चर्यानं विचारतो, 'चांगली तरुण होती .. सशक्त होती ..'

तो माझ्याकडे चमत्कारिक नजरेनं पहातो आणि निघून जातो ..

'विचारा मी !!!'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे नवे अध्यक्ष
श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे निवेदन

विदर्भ साहित्य संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी अध्यक्षपद ग्रहण करताना केलेले निवेदन खाली दिले आहे.

ता. ३ मार्च १९६८ रोजी सकाळी ८॥ वाजता विदर्भ साहित्य संघाच्या नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची सभा उपाध्यक्ष श्री. शंकरराव शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या सभेंत श्री माडखोलकर यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले.

" १९४९ साली विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्ष-पदावर माझी जी निवडणुक झालेली होती, ती कांही रीतसर झालेली नव्हती. माझे स्नेही श्री. हरिभाऊ नेने हे अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी उभे राहिलेले होते; व त्यांची निवडणूक झाल्यासारखीच होती. पण, विदर्भ साहित्य संघाच्या इमारतीसाठी जागा आणि अनुदान मिळविण्याचा प्रश्न कार्यकर्त्यांपुढे प्रामुख्याने होता. त्या कामी माझा उपयोग होईल, अशा समजुतीने न्या. अण्णासाहेब मंगळमूर्ती, श्री. पु. य. देशपांडे, डॉ. कोलते प्रभृति मित्रांनी ऐन वेळी श्री. नेने यांना निवृत्त होण्याचा सल्ला दिला ; व ते कार्याकडे नजर देऊन मागे राहिले. त्यामुळे मी अध्यक्षपदावर निवडून आलो. सुदैवाने त्या वेळचे मध्यप्रदेशचे गृहमंत्री पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या मदतीनें विदर्भ साहित्य मंदिराच्या उभारणीचें काम माझ्या अध्यक्षीय काला-वधीत सुरू झाले.

"याहि वेळी माझी स्वत:ची इच्छा नसतांना, केवळ माझे गुरु कै. श्री. कृ. कोल्हाटकर यांच्या जन्मशताब्दीच्या कामी माझा उपयोग होण्यासारखा आहे, असे वाटल्या-मुळे श्री. त्रि. गो. देशमुख प्रभृती मित्रांनी मला उभे केले; व मी रीतसर निवडून आलो. एरवी, माझ्यापुढे सध्या असलेली माझी संकल्पित कामे विदर्भात सार्वजनिक कामासाठी मला सतत करावा लागणारा प्रवास, माझा रोजचा व्यवसाय आणि माझे ६८ वर्षांचे वय, यामुळें ही तीन वर्षांची जबाबदारी घ्यावयाला मी काही तयार नव्हतो. पण, आपल्या गुरूंच्या शताब्दीचे आपल्या आयुष्यातले हे शेवटले कार्य आपल्या हातून घडावे, एवढ्याच उद्देशाने मी ही जबाबदारी स्वीकारली.

"कोल्हटकर शताब्दी सरकारी रीतीने साजरी करण्या-बद्दल महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्य मंत्री कै. दादासाहेब कन्नमवार यांच्याशी माझे बोलणे झालेले होते; व त्यांनी या कामी पुढाकार घेण्याचें मान्य केलेले होते. सध्याचे मुख्य मंत्री श्री वसंतराव नाईक यांच्याशीही मी याबद्दल बोललेलो आहे. खामगाव येथील कोल्हटकर स्मारक मंदिराचे अपुरे राहिलेले कार्य पुरे करणे, नागपूर विद्यापीठांत कोल्हटकरांच्या नांवाने अध्यासन म्हणजे "चेअर" काढण्याची योजना हाती घेणे, विदर्भ साहित्य संघात कोल्हटकर व्याख्यानमाला होण्याची व्यवस्था करणे, इत्यादी काही कल्पना माझ्या डोळ्यापुढे असून, अनेक कार्यकर्त्यांनी त्याविषयी अनुकूलता व्यक्त केलेली आहे. पुढल्या तीन वर्षांत या कल्पना मूर्ता-वस्थेला आणण्यासाठी सरकार आणि विद्यापीठ यांच्या मदतीने आपण सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे.

"जन्मशताब्दीच्या वेळी कोल्हटकरांची तीन व वरेरकर आणि गडकरी या कोल्हटकरांच्या शिष्यांची तीन अशी एकंदर सहा नाटकें रंगभूमीवर आणण्यात यावीत, अशीहि योजना आहे. त्या कामी श्री. शंकरराव शास्त्री,

(पान ७० वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

विदर्भ साहित्य संघाच्या त्रैवार्षिक निवडणुकी मार्च महिन्यात पार पडल्या, पण ती कार्यकारिणी अवैध ठरून फेरनिवडणुकी झाल्या व त्या निवडणुकीविरुद्धही लवादाकडे याचिका दाखल झाली. या दुसऱ्या याचिकेसंबंधी लवादाचा निर्णय दि. २१ जून रोजी घोषित होऊन फेरनिवडणुकीत निर्वाचित झालेली कार्यकारिणी वैध ठरली आहे. या एकंदर अस्थिर परिस्थितीमुळे 'युगवाणी' चा जूनचा अंक निघू शकला नाही व जून जुलैचा हा जोड अंकही उशीरा प्रसिद्ध होत आहे. यापुढील अंक नेहमीप्रमाणे दर महिन्याच्या एक तारखेला प्रसिद्ध होईल.

याच अस्थिरतेमुळे नव्या संपादक मंडळाची रचना होऊ शकली नाही. ती लवकरच होईल.

डॉ. कोलते यांचे अभिष्टचिंतन

विदर्भ साहित्य संघाचे एक आधारस्तंभ व पूर्वाध्यक्ष डॉ. वि. भि. कोलते यांच्या वयाला दि. २२ जून रोजी साठ वर्षे पूर्ण झाली. या प्रसंगी वि. सा. संघ व 'युगवाणी' चे वतीने आम्ही त्यांचे अंतःकरणपूर्वक अभिष्टचिंतन करून त्यांना दीर्घायुरारोग्य लाभावे अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

मराठीचे ख्यातनाम प्राध्यापक, प्रथितयश लेखक, नामवंत संशोधक, शिक्षण क्षेत्रातील कर्तबगार प्रशासक म्हणून डॉ. कोलते यांचा लौकिक सर्वश्रुत आहे. गेल्या दोन वर्षांपासून नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु झाल्यापासून त्यांच्या कार्याचे क्षेत्र व जबाबदाऱ्या वाढल्या असल्या तरी त्याही क्षेत्रात मराठीचे स्थान व प्रतिष्ठा यासाठी त्यांनी कळकळीने व खंबीरपणे प्रयत्न करून महत्वाची कामगिरी केली आहे. पण कार्याचा व्याप सतत वाढत असतानाही त्यांनी आपला व्यासंग व संशोधन यात खंड पडू दिलेला नाही ही गोष्ट त्यांना अत्यंत भूषणास्पद आहे. त्यांच्या या साहित्यसेवेचा व संशोधनविषयक कामगिरीचा महाराष्ट्राने गौरव केला असून गोंदिया येथील विदर्भ साहित्य संमेलनाचे व गतवर्षी भोपाळ येथील मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. महाराष्ट्र शासनाचे भाषा मंडळ व साहित्य संस्कृती मंडळ व दिल्लीची साहित्य आकादमी यांचे सदस्य या नात्याने मराठीचा गौरव वाढविण्यासाठी व मराठी भाषा, साहित्य व संशोधनकार्याच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केला आहे. मराठी माध्यमाचा व प्रशासनात मराठीचा वापर करण्यातही त्यांनी अत्यंत आग्रहाने पुरस्कार केला असून त्यासाठी विविध विषयावरील मराठी ग्रंथप्रकाशनाच्या योजनेचेही कार्य नेटाने चालविले आहे.

मराठी भाषा, साहित्य व संशोधनकार्य या क्षेत्रातील डॉ. कोलते यांचे हे कार्य असेच पुढे चालू राहावे व त्या बाबतीतील त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून त्यांचा लौकिक वाढावा व मराठीचा गौरव वाढावा हीच शुभेच्छा या प्रसंगी कुणीही करील.

डॉ गोमकाळे यांचे दुःखद निधन

मराठीचे एक नामवंत नाट्यसमीक्षक व विदर्भ साहित्य संघाचे एक जुने निष्ठावंत कार्यकर्ते डॉ. दत्तात्रय रामचंद्र गोमकाळे यांचे अकाली निधन झाले ही घटना अत्यंत दुःखदायक आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डॉ. गोमकाळे हे त्यांच्या निधनापर्यंत अनेक वर्षे न्यायाधिकारी म्हणून कार्य करीत होते, पण साहित्याची, विशेषतः नाट्याविषयीची त्यांची आवड, आस्था व व्यासंग यासाठीच ते अधिक प्रसिद्ध होते. व्यवसाय म्हणून न्यायखात्यातील कामगिरी कर्तव्यदक्षपणे करणाऱ्याला साहित्याचा किंवा इतर व्यासंग करण्याला सवड व संधी फारच कमी मिळते. पण डॉ. गोमकाळे यांनी आपल्या व्यवसायाचे काम चोखपणे पार पाडून राहिलेला सर्व वेळ अत्यंत चिकाटीने साहित्यसेवेला दिला. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, मामा वरेरकर, मो ग. रांगणेकर, आचार्य अत्रे यांच्या नाटकावर त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक विस्तृत समीक्षणपर लेखन केले व या क्षेत्रातील संशोधनाबद्दलच नागपूर विद्यापीठाने त्यांना पीएच्. डी. ची पदवी देऊन त्यांचा गौरव केला. विदर्भ साहित्य संघाच्या नाट्यसमितीचे व कार्यकारिणीचे सदस्य म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. विशेषतः नाट्यसंमेलने, नाट्यमहोत्सव यांच्या यशात त्यांचा वाटा मोठा असे. मराठी नाट्यपरिषदेच्या कार्यकारिणीचेही ते अनेक वर्षे प्रमुख सदस्य होते. गेली दोन वर्षे शरीर अपंग असतानाही त्यांचा व्यासंग व लेखन यात खंड पडला नव्हता, किंबहुना शरीराने सक्तीने दिलेल्या या विश्रांतीचा काळ वाचन-लेखनातच घालविण्याचा त्यांची सतत धडपड होती.

असा हा एक ज्येष्ठ साहित्यिक व कार्यकर्ता आपल्यातून गेल्यामुळे मराठी साहित्याची व वि. सा. संघाची मोठी हानी झाली आहे यात शंका नाही.

श्री. माडखोलकर यांचे निवेदन.... (पान ६८ वरुन)

श्री. बाबुराव चिमोटे, श्री. दारव्हेकर, प्रा. वडसकर यांच्यासारख्या नाट्यविषयांत निपुण असलेल्या मित्रांचे सहकार्य लाभेल, अशी मला आशा आहे. 'युगवाणी' चाही पुढल्या तीन वर्षात या कामी एका विशिष्ट पध्दतीने उपयोग व्हावा, अशी माझी अपेक्षा आहे. नव्या कार्यकारी मंडळाचे सदस्य, विदर्भ साहित्य संघातील जुने कार्यकर्ते आणि पूर्वाध्यक्ष या सर्वांचे सहकार्य जन्मशताब्दीचे हे महत्वाचे काम तडीस नेण्याच्या कामी मला मिळावे, अशी माझी विनंती आहे.

या सगळया योजना कार्यान्वित करण्यासाठी, एप्रिलमध्ये अधिकारग्रहण केल्यानंतर, आपल्या सर्वांच्या सल्ल्याने एक स्वतंत्र प्रातिनिधिक समिती स्थापन करण्याचा माझा विचार आहे. हे काम पूर्ण होईपर्यंत मला प्रकृतीचे स्वास्थ्य आणि आयुष्य लाभावे, अशी माझी ईश्वराजवळ प्रार्थना आहे. १९७१ च्या जूनमध्ये शताद्वि येते. त्याच्या पूर्वतयारीत ही तीन वर्षे मी घालवणार आहे. या कामाव्यतिरिक्त विदर्भ साहित्य संघाचे रोजचे काम पाहाण्याच्या बाबतींत माझ्या परिस्थितीमुळे आणि मर्यादांमुळे माझा विशेष कांही उपयोग होणार नाही. मला आशा आहे की, आज आपण सर्वांनीं माझ्याविषयी जी सद्भावना प्रकट केली, त्या सद्भावनेच्या जोरावर मी कोल्हटकर शताद्वीचे काम चांगल्या रीतीने पार पाडू शकेन.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता
(जून–जुलै १९६८)

मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

सांस्कृतिक समिती

श्री गणेश व्याख्यानमाला

श्री. गणेश व्याख्यानमालेचे ९ वे पर्व ह्यावर्षी श्री. श्यं. खं. गंधे यांनी गुंफले. खालील तारखांना निम्नलिखित विषयावर त्यांची तीन व्याख्याने झाली.
रविवार दि. २८ एप्रिल ६८ – 'संत नामदेव' सोमवार दि. २९ एप्रिल – 'संत एकनाथ'
मंगळवार दि. ३० एप्रिल ६८ – 'संत रामदास'

श्री शिवजयंती कार्यक्रम

संस्थेतर्फे दि. २९ एप्रिल ६८ रोजी सायं. ६.३० वाजता शिवजयंती साजरी करण्यात आली. या वेळी डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी श्री छत्रपतींच्या प्रतिमेला पुष्पहार घातला, आणि नंतर त्यांचे भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, छत्रपतींचे जीवन त्यांच्या आईने घडविले. म्हणून आजच्या स्त्रियांनी आपल्या मुलांवर चांगले संस्कार करून भारताच्या राजकारणाला आणि समाजकारणाला चांगले वळण मिळेल असा प्रयत्न करावा. असा प्रयत्न मातांनी केला तरच शिवजयंती खऱ्या अर्थाने साजरी होईल.

श्री. वा. के. अत्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कै. नाना जोग स्मृतिदिन

बुधवार दि. १ मे १९६८ रोजी सकाळी ८–०० वाजता नाटककार कै. नाना जोग यांच्या पुतळ्याला वि. सा. संघातर्फे व श्री. राजा पाठक यांच्यातर्फे हार अर्पण करण्यात आला.

रात्री ९–१५ वाजता संघाध्यक्ष श्री. ग. श्यं. माडखोलकर यांचे कै. नाना जोग स्मृतिदिना-निमित्त वि सा. संघाचे धनवटे रंगमंदिरात भाषण झाले.

अध्यक्षस्थान श्री. बाबुराव चिमोटे यांनी स्वीकारले होते.

यानंतर श्री. वि. रा. काटे लिखित–'आख्यायिका कालिदासम्' ही संस्कृत एकांकिका पोस्टल ऑडिट रिक्रिएशन क्लबतर्फे सादर करण्यात आल्यानंतर श्री जयवंत दळवी यांची 'डॉ. तपस्वी' व श्री. शं. ना. नवरे यांनी लिहिलेली 'दोन यमांचा' फार्स' या दोन एकांकिका रंजन कला मंदिरातर्फे सादर करण्यात आल्या.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती

मंगळवार दि. २८ मे ६८ रोजी सायंकाळी ७ वाजता स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य या. मु. पाठक यांचे " सावरकरांची कमला " या विषयावर व्याख्यान झाले.

नाटककार कै. श्री. कृ. कोल्हटकर स्मृतिदिन

विदर्भ साहित्य संघातर्फे शनिवार दि. १ जून १९६८ रोजी सायं. ६-३० वाजता संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली नाटककार कै. श्री. कृ. कोल्हटकर यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

या प्रसंगी सुप्रसिद्ध साहित्यिक व वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी कै. श्री. कृ. कोल्हटकर आणि मुंबईस निघणाऱ्या "मासिक मनोरंजन" या मासिकाचे १९१५ सालातील प्रमुख लेखक व कवि यांचे एक छायाचित्र विदर्भ साहित्य संघाला कोल्हटकरांच्या स्मृतिदिनानिमित्त भेट म्हणून दिला.

या छायाचित्राचे अनावरण कोल्हटकर स्मृतिदिनाचे दिवशी विदर्भातील ज्येष्ठ नाटककार श्री. वा. वा. मोळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी श्री. तात्यासाहेब उपाख्य वा. वा. मोळे, डॉ. भाऊसाहेब कोलते, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे, प्रा. म. ल. वऱ्हाडपांडे आणि श्री. मा. नी. गलगलीकर यांची भाषणे झाली.

शेवटी श्री. पु. व्यं. दारव्हेकर यांनी आभार मानले.

नाटककार वीर वामनराव जोशी स्मृतिदिन

विदर्भ साहित्य संघातर्फे सोमवार दि. ३ जून ६८ रोजी सायंकाळी ७ वाजता नाटककार वीर वामनराव जोशी यांचा स्मृतिदिन नाट्य-इतिहास संशोधक श्री. के. टी. देशमुख (मुंबई) यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला

नाटककार वीर वामनराव जोशी यांच्या छायाचित्राला हार अर्पण केल्यानंतर श्री. के. टी. देशमुख, श्री. मा. नी. गलगलीकर आदींची भाषणे झाली.

कै. अ. ब. कोल्हटकर स्मृतिदिन

विदर्भ साहित्य संघातर्फे शनिवार दि. १५ जून ६८ रोजी सायं ६-३० वाजता सुप्रसिद्ध पत्रकार आणि नाटककार कै. अच्युत बळवंत कोल्हटकर यांचा स्मृतिदिन विदर्भातील सुप्रसिद्ध नाट्य-दिग्दर्शक व नट श्री. सखारामपंत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

श्री. सखारामपंत जोशी यांनी कै. अ. ब. कोल्हटकरांच्या छायाचित्राला हार अर्पण केल्यानंतर कोल्हटकरांच्या नाट्यकार्याविषयी थोडक्यात माहिती दिली.

याप्रसंगी वि. सा. संघाचे धिकारी व पाहुणे मंडळी उपस्थित होती.

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय : अभ्यासमंडळ

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या अभ्यासमंडळाला श्री अनंत नारायण देशपांडे यांनी आपल्या ग्रंथ भांडारातून निवडक टीकाग्रंथ नगीदाखल दिल्याबद्दल संस्था त्यांची अत्यंत आभारी आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. महेश एलकुंचवार यांच्या 'रुद्रवर्षा' नाटकावर चर्चा

रविवार दि. २३ जून रोजी सायं. ७ वा. गडकरी सभागृहात प्रा. महेश एलकुंचवार यांच्या 'रुद्रवर्षा' या नाटकावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सुप्रसिद्ध कवी श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) यांनी मंडित केले होते.

सुरुवातीला नाट्यसमितीचे आमंत्रण श्री. पु. व्यं. दारव्हेकर यांनी परिसंवादामागील पार्श्वभूमी विशद करून सांगितल्यावर सर्वश्री प्रभाकर पुराणिक, प्रभाकर मिरास, प्रा. या. वा. वडसकर, श्री भाऊ समर्थ, प्रा डॉ द. भि. कुळकर्णी यांची भाषणे झाली.

महाकवी कालिदास स्मृतिदिन

संस्थेच्या सांस्कृतिक समितीतर्फे दि. २६ जून रोजी सायं. ७ वाजता (आषाढ शुद्ध १) महाकवी कालिदास स्मृतिदिन साजरा झाला.

यावेळी प्रारंभी श्री. शारदेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आल्यानंतर, नागपुरातील प्रसिद्ध गायक डॉ. बाळासाहेब पुरोहित, सौ. कुसुम चाफळे व कु. सुमन रेखडे यांनी कालिदासाच्या 'मेघदूत' काव्यातील काही श्लोक गाऊन दाखविले.

या प्रसंगी, संस्कृतचे अभ्यासक श्री. अ. गो. देशपांडे यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले. शेवटी श्री. वासुदेवराव चोरघडे यांनी उपस्थित असलेल्यांचे आभार मानले.

नाट्य समिती

मराठी रंगभूमी प्रदर्शन

नाट्यसमितीतर्फे नाट्य इतिहास संशोधक श्री. के. टी. देशमुख (मुंबई) यांच्या नाट्यचित्र, ग्रंथ व वस्तूंचे प्रदर्शन श्री शिवाजी ग्रंथालयाचे जागेत गुरुवार दि. १६ मे ६८ पासून ते शनिवार दि. १ जून ६८ पर्यन्त आयोजित करण्यात आले होते.

मराठी रंगभूमी प्रदर्शनाला राजेबहादुर श्रीमंत राजे फत्तेसिहराव भोसले, श्रीमंत राजेसाहेब जयसिंगराव भोसले, डॉ. शिवाजीराव पटवर्धन, संघाध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर, डॉ. वि. भि. कोलते, श्री. आ. रा. देशपांडे (अनिल), प्रा. भ. श्री. पंडित, महाराष्ट्राचे संपादक श्री. भाऊसाहेब पंडित, नागपूर इतिहास संशोधक श्री. शंकरराव चट्टे विदर्भातील सुप्रसिद्ध नाट्यदिग्दर्शक व नट श्री. सखारामपंत जोशी तसेच अनेक प्राध्यापक, रसिक नागरिकांनी तथा अभ्यासूंनी भेट दिली.

दि. २६ मे ६८ रोजी सकाळी ८-१५ वाजता संघाध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी कै. राम गणेश गडकरी यांच्या जयंती निमित्त वि. सा. संघाचे श्री. शिवाजी ग्रंथालयात आयोजित करण्यात आलेल्या मराठी रंगभूमी प्रदर्शनात ठेवलेल्या कै. रा. ग. गडकरी यांच्या छायाचित्राला हार अर्पण केला. या प्रसंगी. वि. सा. संघाचे सर्व कार्यकारी सदस्य उपस्थित होते.

डॉ. द. रा. गोमकाळे यांना श्रद्धांजली

सुप्रसिद्ध नाट्यसमीक्षक व निवृत्त न्यायाधीश डॉ. द. रा. गोमकाळे, यांना सोमवार दि. १३ मे रोजी दुपारी ३ वाजता हृदयविकाराने देवाज्ञा झाली. ही दुःखद वार्ता कळताच सायंकाळी संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत डॉ. गोमकाळे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाची त्रैवार्षिक निवडणूक

वि. सा. संघाची त्रैवार्षिक (१९६८ ते १९७१) फेरनिवडणूक होऊन तिचा निकाल रविवार दि. १९ मे ६८ रोजी निर्वाचनाधिकारी श्री. मनोहर नारायण परांजपे यांनी जाहीर केला.

कार्यकारी मंडळाचे सभासदत्वाकरिता एकूण ३५ उमेदवार उभे होते. त्यापैकी पुढील सोळा सदस्य निवडून आले.

१.	श्री. बाबुराव चिमोटे,	२.	श्री. पु. व्यं. दारव्हेकर,
३.	श्री. राम शेवाळकर,	४.	प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे,
५.	श्री. शं. बा. शास्त्री,	६.	श्री. त्रि. गो. देशमुख,
७.	श्री. मा नी. गलगलीकर,	८.	श्री. वा. के. अत्रे,
९.	श्री. चं. शं. कुळकर्णी,	१०.	श्री. आ. ग. जोग,
११.	श्री. अ. ल. लिमये,	१२.	प्रा. भाऊ मांडवकर,
१३.	श्री. शांताराम पोटदुखे,	१४.	श्री. म. गो. भांवुरकर,
१५.	श्री. या. वा. वडसकर,	१६.	प्रा. दे. गं. सोटे.

या निवडणुकीचे वेळी गणक म्हणून श्री. सेवकराम पाटील आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. निर्वाचनाधिकारी श्री. मनोहर नारायण परांजपे यांनी निकाल जाहीर होईपर्यंत उत्कृष्टपणे कार्य पार पाडल्याबद्दल आम्ही त्यांचे व सर्व गणकांचे अत्यंत आभारी आहोत.

कार्यकारी मंडळाची सभा

विदर्भ साहित्य संघाच्या निवडून आलेल्या कार्यकारी मंडळाची पहिली सभा रविवार दि. २६ मे ६८ सकाळी ८–३० वाजता संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे अध्यक्षतेखाली झाली.

सभेत खालीलप्रमाणे पदधिकारी १९६८ ते १९७१ या कालावधीसाठी निवडण्यात आले.

१. उपाध्यक्ष :– प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख व प्राचार्य राम शेवाळकर
२. सरचिटणीस :– श्री. मा. नी. गलगलीकर
३. कोषाध्यक्ष :– श्री. म. गो. भांबुरकर
४. चिटणीस :– श्री. अ. ल. लिमये, श्री. शांताराम पोटदुखे, श्री. वा. के. अत्रे
५. संपादक, " युगवाणी " :– प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे
६. संचालक, परीक्षा समिती :– श्री. ग. स. देशपांडे
७. आमंत्रक, सांस्कृतिक कार्यक्रम समिती :– श्री. वासुदेवराव चोरघडे
८. आमंत्रक, नाट्यसमिती :– श्री. पु. व्यं. दारव्हेकर
९. आमंत्रक, श्री शिवाजी ग्रंथालय, :– श्री. चंद्रकांत कुळकर्णी
१०. आमंत्रक, प्रकाशन समिती :– प्रा. भाऊ मांडवकर
११. आमंत्रक, कला केन्द्र समिती :– श्री. दुधपचारे
१२. आमंत्रक, संशोधन समिती :– प्रा. दे. गं. सोटे
१३. आमंत्रक, गडकरी समिती :– श्री प्रभाकर गडकरी
१४. आमंत्रक, अर्थ समिती:– कोषाध्यक्ष श्री. म. गो मांबुरकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वरील कार्यकारी मंडळाच्या सभेनंतर वि. सा. संघाच्या कार्यकारिणीचे एकेकाळचे सभासद आणि विदर्भ साहित्य संघाचे हितचिंतक माननीय नासिकराव तिरपुडे ह्यांचा महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात वनमंत्री म्हणून समावेश झाल्याबद्दल वि. सा. संघाच्या कार्यकारिणीने आनंद व्यक्त करून त्यांचे अभिनंदन केले.

वि. सा. संघाचे आजीव सदस्य व महाराष्ट्राचे नामवंत नाट्यसमीक्षक डॉ. द. रा. गोमकाळे आणि श्री. स. वि. लिमये ह्यांच्या दुःखद निधनाबद्दल कार्यकारिणीची सभा शोक व्यक्त करते असा ठराव करण्यात आला. सभेच्या शेवटी प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे यांनी अध्यक्षांचे आभार मानले.

* * * * * * * *

परीक्षा समिती : वि. सा. संघ

केंद्राधिकाऱ्यांना सूचना व विनंती

१) विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणाऱ्या मराठी भाषा आणि वाङ्मयाच्या परीक्षांविषयी पुढील माहिती कळविण्यात येत आहे.

उद्देश :- मराठी भाषा आणि वाङ्मय या विषयाची गोडी वाढविण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील अ-मराठी भाषिकांमध्ये मराठीचा प्रचार करण्याकरिता अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

फेब्रुवारी १९६८ पासून परीक्षा समितीने अभ्यासक्रमात आवश्यक बदल केला असून विदर्भ माध्यमिक शिक्षण मंडळ आणि नागपूर विद्यापीठ यांच्या विद्यमाने होणाऱ्या सर्व परीक्षांशी मराठी विषयापुरता वि. सा. संघ परीक्षा समितीने नेमलेला अभ्यासक्रम शक्यतो समरूप व समकक्ष ठेवला आहे.

२) आपण केन्द्र उघडण्याची इच्छा दर्शविल्यास आपणाकडे अभ्यासक्रम पाठविण्यात येईल. अ-मराठी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी आपण आपल्या दृष्टीने करावी, अशी अपेक्षा आहे.

३) आगामी आक्टोबर १९६८ सत्राची परीक्षा शनिवार दि. ५-१०-६८ आणि रविवार दिनांक ६-१०-६८ ला घेण्यात येईल.

४) नवीन केन्द्र सुरू करण्यासाठी कमीत कमी २५ विद्यार्थी परीक्षेत बसविले तरच केन्द्राला मान्यता देण्यात येते असा समितीचा परिपाठ आहे. परीक्षार्थी आवेदनपत्र मूल्य २५ पैसे प्रमाणे केन्द्रातच अवांतर खर्चासाठी राखून ठेवावे. केवळ परीक्षार्थ्यांचेच निर्धारित शुल्क केन्द्रीय कार्यालयाकडे पाठवावे.

आपण आपल्या केन्द्रातून दिनांक १० सप्टेंबर ६८ पर्यन्त परीक्षार्थी आवेदनपत्रे सशुल्क भरून घेऊन केन्द्रीय कार्यालयाकडे दिनांक १५ सप्टेंबर ६८ चे आत पाठविण्याची दखल घ्यावी, तदनंतर आलेली आवेदनपत्रे स्वीकृत करण्यात येणार नाहीत.

प्रत्येक सत्रात जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेस बसवून आम्हास सहकार्य देऊन उपकृत करावे, ही विनंती.

ग. स. देशपांडे
संचालक, परीक्षा समिती

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाची विक्रीस तयार असलेली प्रकाशने

पुस्तके		रु. पैसे
१. कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह : भाग २		३–००
२. The Vedasthan or The Ancient Home of the Indo-Aryans	ले. कै डॉ. तु. ज. केदार	३–००
३. प्रयोगक्षम मराठी नाटके	डॉ. मु. श्री. कानडे	१५–००
कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध		
४. नाटककार गडकरी	डॉ. द. रा. गोमकाळे	०–३१
५. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०–५०
६. गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगत	प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०–५०
७. सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	द. वि. तेंडूलकर	०–५०
८. गडकऱ्यांची खरी भूमिका	प्रा. भ. श्री. पंडित	०–५०
९. गडकऱ्यांची नाटयशैली	प्रा. रू. पा. पांजणकर	०–५०
१०. गडकऱ्यांची नाटयप्रकृति व नाटयसृष्टी	वसंत वरखेडकर	०–६०
११. गडकरीकालीन नाटयतंत्र व गडकरी	वसंत वरखेडकर	०–६०

सर्व प्रमुख पुस्तकविक्रेत्यांकडे मिळतात. न मिळाल्यास मागणी करा–

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर–१.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

– वार्षिक साधारण सभेची सूचना –

घटना नियम १० (अ) प्रमाणे विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की विदर्भ साहित्य संघाची वार्षिक साधारण सभा रविवार, दि. २८ जुलै १९६८ रोजी दुपारी ४ वाजता नागपूर येथे केन्द्रीय कार्यालयात भरेल.

– सभेपुढील विषय –

१. मागील सभेचा अहवाल. २. गतवर्षीचे कार्यवृत्त.

३. १९६७ – ६८ सालाचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब.

४. १९६८ – ६९ चे अंदाज पत्रक. ५. ६८–६९ करिता अधिकृत हिशेबतपासनीसांची नेमणूक.

६. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

गणपूर्तीच्या अभावी सभा स्थगित झाल्यास ती सभेच्या वेळेनंतर त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरविण्यात येईल. सभासदांना सभेत ठराव किंवा सूचना मांडावयाची असल्यास ती लेखी स्वरूपात सभेपूर्वी चारदिवस अगोदर केन्द्रीय कार्यालयात पोहोचावयास पाहिजे.

ह्या सभेला सर्व सभासदांनी उपस्थित राहावे, ही विनंती.

मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस

दि. ८ जुलै १९६८

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" [Yugwani] Regd. No. MH 1174

प्रकाशक व मुद्रक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १.

मुद्रणस्थळ : व्हीनस प्रिंटींग हौस, वैद्यवाडी, धंतोली, नागपूर १.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ